# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १७ जुलै, २०१५ / आषाढ २६, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वित्त आणि नियोजन, वने मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६८**

---

### दमणगंगा-पिंजाळ आणि पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्पास राष्ट्रीय प्रकल्प घोषीत करणे व कोयना अवजलाचे पाणी मुंबईला देण्याबाबत

**(१) * १७९६५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील कोयना धरणातील पाणी मुंबईला द्यावे तसेच दमणगंगा-पिंजाळ आणि पार-तापी-नर्मदा जोडप्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प जाहीर करावा तसेच इतर मागण्यांवर निर्णय घेण्याबाबत माहे मे, २०१५ च्या तिस-या आठवड्यात मा.केंद्रिय जलसंपदा मंत्री यांचे समवेत झालेल्या बैठकीत राज्याचे मा.जलसंपदा मंत्री यांनी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयांचे थोडक्यात स्वरुप काय व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदरचा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प घोषित करणे व राज्याच्या हक्काचे पाणी राज्यालाच मिळावे यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय. अंशतः खरे आहे.

मा.केंद्रिय जलसंसाधन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली दि.१४.०५.२०१५ रोजी नदीजोड प्रकल्पासाठीच्या विशेष समितीची ४ थी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांनी राज्याची भूमिका मांडून खालील विनंती केली.

(अ) कोयना अवजलाचे पाणी राष्ट्रीय प्रकल्पांतर्गत नदीजोड प्रकल्प राबवून मुंबईस द्यावे.

(ब) दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी-नर्मदा हे नदीजोड प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करावे.

(क) नार-पार-तापी-नर्मदा खो-यातील सर्वसाधारणपणे २०० मी. उंचीच्या टप्प्यातील आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य नदीजोड योजनाद्वारे गोदावरी व तापी खोऱ्यात वळविण्याचे प्रस्तावित आहे. त्याचबरोबर उर्वरित उपलब्ध पाण्यापैकी महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रातील जास्तीत जास्त पाणी बोगद्याद्वारे वळवून महाराष्ट्रात कसे वापरात आणता येईल, याबाबतचा अभ्यास राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांनी करावा.

(ड) नदीजोड योजनेंतर्गत राष्ट्रीय प्रकल्पांचे निकष ठरवितांना केवळ सिंचन क्षेत्र हे एकमेव निकष न ठेवता मुंबई सारख्या महानगराना पाणी पुरवठा करणारे प्रकल्प, महाकाय भूजल पुन:भरण योजना इत्यादी प्रकल्पांचाही विचार व्हावा.

(२) मुंबई महानगरपालिकेने दमणगंगा-पिजांळ प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्रीय जल आयोगाच्या मान्यतेसाठी जानेवारी, २०१५ मध्ये सादर केलेला आहे. तसेच पार-तापी-नर्मदा प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जल विकास अभिकरणामार्फत लवकरच पूर्ण होणे अपेक्षित आहे.

सदर बैठकीत दमणगंगा-पिजांळ व पार-तापी-नर्मदा हे प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घेण्याच्या दृष्टीने शक्यता तपासण्याबाबत मा.केंद्रिय जलसंसाधन मंत्री यांनी जलसंसाधन मंत्रालयास निर्देश दिले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील १२९ सिंचन प्रकल्प निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२) * २५७६९ श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात सद्य:स्थितीत १२९ सिंचन प्रकल्प निधी अभावी अपूर्ण अवस्थेत आहेत, त्यात १३ मोठे, १४ मध्यम आणि १०३ लघु प्रकल्प आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनस्त असलेल्या उक्त प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी १२ हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती आणि सिंचन सुविधांचा अभाव लक्षात घेता अपूर्ण अवस्थेतील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) मराठवाड्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी केव्हा उपलब्ध करण्यात येईल ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडील ८ मोठे, ७ मध्यम व ४९ लपा असे ६४ प्रकल्प आणि महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडील १ मोठे, १ मध्यम व ५ लपा असे ७ प्रकल्प असे एकंदरीत ७१ प्रकल्प मराठवाड्यात बांधकामाधीन आहेत.

(२) होय.

(३) व (४) आर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांचे निदेश यानूसार निधी उपलबध करुन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**कोल्हापूर जिल्ह्यात पाणलोट विकासकामांमध्ये**
**३० कोटी रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(३) * २१४८७ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात विशेषत: राधानगरी, भुदरगड, करवीर तालुक्यात जलयुक्त शिवार अभियान तसेच वसुंधरा पाणलोट विकासकामांमध्ये पर्यवेक्षक, कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी सुमारे ३० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी तातडीने चौकशी करण्याबाबत राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी, जिल्हा कृषी अधिकारी यांना दिनांक २५ मे २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) श्री.विजय देवणे, शिवसेना जिल्हाप्रमुख, कोल्हापूर यांनी दि. २५ मे, २०१५ रोजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे अशा विषयाची तक्रार केली आहे.तसेच स्थानिक वृत्तपत्रातही अशा बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. यानुषंगाने, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत झालेल्या मृद व जलसंधारण तसेच प्रेरक प्रवेश कामांची सखोल चौकशी करण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केली असून समितीस चौकशीचे निदेश जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्यामार्फत देण्यात आले आहेत.

-----------------

**विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे काम राष्ट्रीय जलविकास प्राधिकरणाकडून करण्याबाबत**

**(४) * १८३२६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या नदीजोड प्रकल्पांतर्गत विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे काम हाती घेण्यास राष्ट्रीय जलविकास प्राधिकरणाने संमती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदी जोड प्रकल्पामुळे गोसीखुर्द प्रकल्पातील वाहून जाणारे १९०० दशलक्ष घन मीटर पाणी विदर्भातील अन्य जिल्ह्यात वळविण्यात येणार असून त्याबाबतचा अहवाल तयार करण्याचे निर्देश विदर्भ पाटबंधारे मंडळाच्या जलविज्ञान विभागाच्या मुख्य अभियंता यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे तसेच या प्रकल्पासाठी किती खर्च अपेक्षित आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१), (२) व (३) गोसीखुर्द प्रकल्पस्थळी उपलब्ध असलेले अतिरिक्त पाणी वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेद्वारे विदर्भातील तुटीच्या भागात वळविण्याचे प्रस्तावित आहे. याबाबत राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांनी तयार केलेल्या पूर्व अर्हता प्रकल्प अहवालानुसार प्रकल्प व्यवहार्य आहे. याकरिता राज्य शासनाने दि.०६.०४.२०१५ चे पत्रान्वये राष्ट्रीय जलविकास अभिकरणास सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची विनंती केली असून सदर अभिकरणामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम प्रगतीत आहे.

-----------------

**शासनाच्या विविध विभागाकडून केल्या जाणाऱ्या खर्चाचे हिशेब योग्य रितीने ठेवण्यात न आल्याबाबत कॅगने आपल्या अहवालात ओढलेले ताशेरे**

**(५) * २००३४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाकडून दिल्या जाणा-या निधीचा विभागांकडून हिशेब दिला जाणे बंधनकारक असताना अनेक वर्षे विविध विभागांकडून निधीचा वापर किंवा काम पुर्ण झाल्याबाबतची प्रमाणपत्रेच सादर करण्यात आलेली नाहीत, यातूनच ६८ हजार कोटीची कामे पुर्ण झाली की नाही याची नोंदच नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधीचा वापर झाला नाही किंवा अखर्चित निधी परत करणे अभिप्रेत असतानाही नगरविकास विभागात सहकार व वस्त्रोद्योग (५५७५ कोटी), नियोजन (६७२६ कोटी), ग्रामविकास (४१०० कोटी), शालेय शिक्षण (१२ हजार कोटी) इत्यादी विभागात वापर नसलेला निधी तसाच पडून राहील्याचे निष्पन्न झाले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, हा हिशेब देणे बंधनकारक असतानाही विविध विभागांनी हिशेब न देण्यामागील कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) ते (६) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१४ रोजी संपलेल्या वर्षातील राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालातील परिच्छेद ३.१ व ३.९ नुसार अनुदानित संस्थांना दिलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्याबद्दल निरीक्षण नोंदविलेले आहेत. संबंधित संस्थेत प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था व अनुदानित शैक्षणिक संस्थांचा अंतर्भाव आहे. अशा संस्थेस सर्वसामान्यपणे खर्च करण्याची व ह्या संस्थेचे लेखापरीक्षणाची पध्दत विहीत केली आहे. अनुदान अखर्चित पडून असल्यास त्या संबंधी विहीत कालावधी नंतर त्या संस्थेच्या लेखा परिक्षण अहवालामध्ये नोंद घेण्याची पध्दत आहे.

दरवर्षी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या राज्याच्या वित्त व्यवस्थेवरील अहवालात उपयोगिता प्रमाणपत्राविषयी माहिती समाविष्ट असते. त्यानुषंगाने वित्त विभागामार्फत आढावा घेतला जातो.

प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्र व खर्च व जमा ताळेबंद यांचा आढावा घेण्यासाठी सन २०१३ मध्ये मा.मुख्य सचिवांकडे सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांच्या उपस्थितीत वरील विषयासंदर्भात आढावा घेण्यात आला. त्यावेळेस प्रधान महालेखापाल (ले.व.ह.) महाराष्ट्र-१ या स्वत: उपस्थित होत्या. याबाबतच्या दि.२५.४.२०१३ व दि.२८.५.२०१३ इत्यादी बैठका मा.मुख्य सचिवांच्या दालनामध्ये घेण्यात आल्या.

मा.मुख्य सचिव यांचेकडील सचिव समन्वय समितीमध्ये सन २०१४-१५ मध्ये दि. २५ मार्च, २०१५ व दि.८ एप्रिल, २०१५ रोजीच्या बैठकीत याविषयीचा आढावा घेण्यात आला

मा.मुख्य सचिव यांनी दिलेल्या निर्देशानुसार वित्त विभागाच्या सचिव स्तरावर सदर प्रलंबितता कमी करण्यासाठी दर महिन्याला मंत्रालयीन विभागांनी नियुक्त केलेल्या नोडल अधिकाऱ्यांसमावेत बैठक घेण्यात येते.

सदर प्रलंबितता कमी करण्यासाठी वित्त विभागाने परिपत्रक क्र.मआख-२०१४/प्र.क्र..४२/विनियम, दि.९.१०.२०१४ अन्वये प्रशासकीय विभागांना निर्देश दिलेले आहेत.

याप्रमाणे वित्त विभागातर्फे नियमित कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**लाखांदूर तालुक्यातील (जि.भंडारा) महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत अल्पभूधारक कोरडवाहू शेतक-यांच्या सिंचन विहिरींच्या प्रलंबित प्रस्तावाबाबत**

**(६) * २१५०३ श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखांदूर तालुक्यातील (जि.भंडारा) महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत अल्पभूधारक कोरडवाहू शेतक-यांनी सिंचन विहिरींसाठी सन २०१२-१३ मध्ये अर्ज सादर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतुन पहिल्या टप्प्यात काही शेतक-यांना लाभ मिळाला, मात्र दुस-या टप्प्यातील सुमारे २८५ शेतक-यांचे प्रस्ताव अजुनही प्रलंबित असल्याचे माहे जुन, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरडवाहू शेतक-यांचे सिंचन विहिरीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे नेमके कारण काय व सदर प्रस्तावाला किती कालावधीत मान्यता देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) सन २०१५-१६ मध्ये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लाखांदूर यांच्याकडे २८५ शेतक-यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्जांमध्ये त्रुटी असल्याने त्यांची पुर्तता करण्याकरिता अर्ज ग्रामपंचायतींना परत करण्यात आले आहेत. ग्रामपंचायतींकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून विहिरींच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरी देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जुन्नर तालुक्यातील (जि.पुणे) येथील पिंपळगांव जोगा, डिंगोरे, खामुंडासह इतर गावांमध्ये बिबट्याने केलेल्या हल्ल्याबाबत**

**(७) * १७६८० श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर तालुक्यातील (जि.पुणे) येथील पिंपळगांव जोगा, डिंगोरे, खामुंडासह इतर गावांमध्ये बिबट्याने केलेल्या हल्ल्यामध्ये प्रथम चार व्यक्तिंचा मृत्यू तर दुसऱ्यावेळी सात व्यक्तिंचा तसेच एका लहान बालकाचाही मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्नर तालुक्यातील आतापर्यंत बिबट्याच्या हल्ल्यामध्ये मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना शासनाकडून पूर्ण आर्थिक मदत देण्यात आली आहे काय, आतापर्यंत किती व्यक्तिंना मदत देण्यात आली आहे, तिचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, जुन्नर तालुक्यामध्ये भर वस्तीमध्ये बिबट्यांचे वारंवार हल्ले होऊन रहिवाशी मृत्यू वा जखमी होत असल्याचे प्रकार वाढत असल्यामुळे या बिबट्यांच्या संचाराला आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोगा, डिंगोरे, खामुंडी या गांवामध्ये व परिसरात बिबट्यांच्या हल्यात दिनांक १६.११.२०१४ रोजी पांगरी तर्फे मढ या ठिकाणी सखुबाई दादाभाऊ वारे, रा.ओतूर-तेलदरा, ता.जुन्नर, दिनांक १७.०४.२०१५ रोजी खामुंडी येथे प्रविण देवराम दुधवडे, रा.पिंपळगांवमाथा, ता.संगमनेर, दिनांक ०३.०५.२०१५ रोजी डिंगोरे येथे साई संतोष मंडलिक, रा.डिंगोरे, ता.जुन्नर व दिनांक २६.०५.२०१५ रोजी सखुबाई नानाभाऊ हिले, रा.पिंपळगांव जोगा, ता.जुन्नर अशा चार जणांचा मृत्यू झालेला असून त्यापैकी २ बालके आहेत व अन्य घटनांमध्ये सात जण जखमी झालेले आहेत.
(२) बिबट हल्यामध्ये मृत व्यक्तींच्या वारस नातेवाईकांना प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार सखुबाई दादाभाऊ वारे यांचे वारस नातेवाईक यांना रु.५ लक्ष तर उर्वरित ३ मृतांच्या वारस नातेवाईकांना प्रत्येकी रु. ८ लक्ष अशी एकूण रुपये २९ लक्ष आर्थिक मदत (सानुग्रह रक्कम) देण्यात आली आहे. जखमी व्यक्तींवर शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आलेले असून निर्मला शिवाजी पारधी व रेणुका गोपाळ वाघमारे या जखमींना रुपये १९,५००/- उपचारासाठी तातडीची मदत देण्यात आली आहे.
(३) जुन्नर तालुक्यामध्ये बिबट्याचे वास्तव्य हे वनक्षेत्रात नसून वनेत्तर क्षेत्र विशेषत: उस, केळी सारख्या बागायती क्षेत्रात आहे, बिबट्याच्या संचारास आळा घालण्यासाठी जलद बचाव गटाची स्थापना करुन गस्त वाढविण्यात आली आहे. पशुवैद्यकिय सेवा उपलब्ध ठेवणे, पिंजरे लावून बिबट बंदिस्त करणे, घडी पत्रिका, पोस्टर्स दृकक्षाव्य माध्यमांद्वारे जनजागृती व प्रबोधन, ग्रामस्थांचे सहभागातून विशेष पथके, कार्यशाळा व वन्यजीव अभ्यासकांचे मार्गदर्शन तसेच वनविभागातील इतर वनपरिक्षेत्रातील वन कर्मचा-यांची या परिसरात गस्तीसाठी पथके निर्माण करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यात पंचायत समितीने रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर केलेल्या रस्त्यांबाबत

**(८) * १६६५९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कापसी (ता.सावली, जि.चंद्रपूर) ग्रामपंचायतीचे उपसरपंच आणि ग्रामसेवक यांनी पंचायत समिती सावलीने रोहयोतंर्गत मंजूर केलेल्या रस्त्याचे मातीकाम न करता ग्रामपंचायत व भुमापक नकाशात नसलेल्या आणि प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या उपरी हेटी ते भंडारदरा तलावाच्या पाळीपर्यंत रस्त्याचे मातीकाम बेकायदेशीर व नियमबाह्यरित्या माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले असल्याची माहिती दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांचे मातीकाम मौजा चोरखल रिठ येथे भु.क्र. १९, आरजी ०.५१ हे.आर., भु.क्र.७० आरजी १.४९ हे. आर श्री.बाबुराव गणपती भांडेकर, रा.कापसी यांच्यासह इतर शेतक-यांच्या शेतजमिनीमधून तसेच वनविभागाच्या सर्वे नं.५६ मध्ये असलेल्या जंगलामधून रस्त्याचे मातीकाम विनापरवाना करण्यात आले असल्याचे नागरिकांनी तहसिलदार सावली, संवर्ग विकास अधिकारी सावली, वनपरिक्षेत्र अधिकारी, सावली यांच्याकडे तक्रार केलेली असुन याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कापसी, उपरी परिसरातील नागरिकांनी लेखी निवेदनासह लोकप्रतिनिधीकडे तक्रार करताच या संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधितांवर कार्यवाही करण्यात यावी असे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मे, २०१५ रोजी जिल्हाधिकारी चंद्रपूर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्याकडे दिले असून अद्यापही कोणत्याही विभागाने कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सदर प्रकरणी तक्रार प्राप्त झाली, तथापि बेकायदेशीर रित्या रस्त्याचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) लोकप्रतिनिधीच्या तक्रारीस अनुसरुन नायब तहसिदार यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समिती मार्फत प्रकरणाची चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये महसूल विभागाच्या जुन्या वहिवाटीच्या रस्त्यावरचे मग्रारोहयोंतर्गत मातीकाम झालेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील २७ हजार ग्रामपंचायतीमधील हजारो संगणक परिचालकांना मानधन मिळत नसल्याबाबत**

**(९) * १७२२१ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २७ हजार ग्रामपंचायतीमधील हजारो संगणक परिचालकांना गेल्या ६ महिन्यापासून मानधन मिळालेले नसून, त्यांचे थकीत मानधन देऊन परिचालकांना शासन सेवेत रुजू करुन घेण्याबाबत महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटनेने दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी आझाद मैदान येथ मोर्चा काढून आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील संगणक परिचालकांचे मानधन त्वरीत देण्याबाबत व त्यांच्या इतर मागण्यांबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात २७ हजार संगणक परिचालक (VLE) नाहीत. तथापि कार्यरत असलेल्या संगणक परिचालकां (VLE) पैकी काहीच संगणक परिचालकांनी (VLE) विविध मागण्यासाठी दि.३१.३.२०१५ रोजी आझाद मैदान येथे मोर्चा काढला होता.

(२) व (३) या प्रकरणी, मा.मंत्री (ग्रा.वि) यांनी प्रत्यक्षात आंदोलनकर्त्यांना भेट दिली व झालेल्या चर्चेनुसार तसेच मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निर्देशानुसार मा.मंत्री व मा.राज्यमंत्री (ग्रा.वि) यांनी निवेदनकर्ते संगणक परिचालक (VLE) सोबत बैठक घेवून चर्चा केली त्याअनुषंगाने दि.१३.५.२०१५ रोजी थकीत देयक अदायगीबाबत मार्गदर्शक सुचनांचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमधील संगणक परिचालकां (VLE) चे माहे जानेवारी, २०१५ मध्ये मानधन अदा केले आहे. माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये बहुतांश संगणक परिचालकां (VLE) चे मानधन अदा केले असून माहे मार्च, २०१५ पासून बरेच संगणक परिचालक (VLE) हे काम बंद आंदोलनात सहभागी असल्याने त्यांच्या उपस्थितिबाबतचा आढावा घेवून सुधारित परिगणनेनुसार मानधन अदायगीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

दि.२७ मे, २०१४ च्या शासन निर्णयामध्ये स्पष्ट केलेनुसार ई-पंचायत प्रकल्पाअंतर्गत महाऑनलाईन मार्फत कंत्राटी सेवेवर नेमलेले तांत्रिक मनुष्यबळ हे राज्यशासन, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांचे कंत्राटी कर्मचारी नाहीत, ते गाव पातळीवरील उद्योजक (VLE) आहेत. ई-पंचायत प्रकल्पावर काम केल्यामुळे त्यांना राज्यशासन अथवा पंचायतीराज संस्थामध्ये कंत्राटी अथवा कायम कर्मचारी म्हणून मागणी करण्याचा कोणताही अधिकार असणार नाही.

तसेच १३ व्या वित्त आयोगाचा शिल्लक निधी वापरुन प्रचलित धोरणानुसार प्रकल्प अमंलबजावणी साठी सप्टेंबर, २०१५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून पन्हाळा तालुक्यात राबविण्यात आलेल्या हरीयाली प्रकल्पात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१०) * २३२३२ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून पन्हाळा तालुक्यात राबविण्यात आलेल्या हरीयाली प्रकल्पात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण करुन यासंदर्भात २६ आजी-माजी सरपंच, १३ ग्रामसेवक यांना दोषी धरण्यात आले आहे, ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहार प्रकरणाचा उलगडा होवून सव्वा वर्ष उलटले तरी, अद्याप कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) पन्हाळा तालुक्यातील ११ गावामध्ये हरियाली योजनेअंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराबाबत नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार १३ ग्रामसेवक व २६ आजी-माजी सरपंचांना जबाबदार धरण्यात आले आहे.

संबंधित जबाबदार १३ ग्रामसेवक यांना नुकसानीच्या रक्कम वसुलीसह महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील ६(२) नुसार खातेनिहाय चौकशीकामी तसेच जबाबदार असणारे २६ आजी-माजी संरपंच यांचेवर रक्कम वसुलीसह महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार कारवाई का करण्यात येवू नये याबाबतच्या कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. संबंधित ग्रामसेवकांचे खुलासे प्राप्त झाले असून मुद्दे निहाय खुलासा तपासणे/पडताळणीची कार्यवाही सुरु आहे. ग्रामसेवकांचे खुलासे पडताळणी नंतर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. संबंधित २६ आजी माजी सरपंच यांचे खुलासे अप्राप्त आहेत.

तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीमध्ये तांत्रिक सहाय्य व अन्य पर्यवेक्षिय जबाबदारी पार पाडणाऱ्या यंत्रणाचा गैरव्यवहारामध्ये सहभाग अथवा पर्यवेक्षिय टाळाटाळ/कसूरी केली आहे काय याबाबत छाननी/ पडताळणी सुरु असून पडताळणीनंतर त्यांचेवर नियमानुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई तालुक्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विहीरीसाठी केंद्र शासनाने अनुदान मंजूर करुनही विहीरींचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(११) * १८१०८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दिलीप वळसे-पाटील**

**(आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्वीच्या एकत्रित ठाणे जिल्ह्यातील वसई तालुक्यासाठी सन २००८-२००९ मध्ये केंद्र शासनाने अल्पभूधारक शेतक-यांसाठी ४८२ जवाहर विहिरी मंजूर करुन प्रत्येक विहिरीसाठी ७० हजार रुपये याप्रमाणे २ कोटी ८८ लाख ४० हजार रुपये इतका निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मंजूर विहिरीपैकी ७० विहिरी सद्यःस्थितीत पूर्ण असून उर्वरित ४१२ विहिरी मंजूर होवूनही त्यांची कामे सुरु झाली नसल्याचे मात्र अनुदानाची रक्कम दिली गेली असल्याचे प्रकरण नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

## मौदा तालुक्यातील (जि.नागपूर) पावडदौना, वांजरा, मोहरखेडी या खेड्यांना जोडणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१२) * २३०८९ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौदा तालुक्यातील (जि.नागपूर) राष्ट्रीय महामार्ग क्र.६ नागपूर-भंडारापासून सहा किलोमीटर अंतरावर पावडदौना, वांजरा, मोहरखेडी या खेड्यांना जोडणारा रस्ता दुरावस्थेत असून त्यावर आतापर्यंत लाखो रुपये खर्चूनही हा रस्ता अत्यंत खराब झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा कच्चा रस्ता पक्का करण्याकरिता शासन निधी उपलब्ध करून देणार आहे काय,

(३) अद्याप या रस्त्याच्या दुरुस्तीसंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. सन २०३१-१४ व २०१४-१५ मध्ये केलेली कामे सुस्थितीत आहेत. ज्या लांबीमध्ये कोणतेही काम अद्यापपर्यंत झालेले नाही अशी लांबी जास्त क्षतिग्रस्त झाली आहे.

(२) व (३) सदर रस्ता सुधारण्याचे कामे सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांना सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महिला व बालविकास विभागाने दर करारावर नेमलेल्या पुरवठादाराने निकृष्ट दर्जाच्या चिक्कीचा व खिचडीचा पुरवठा केला असल्याबाबत

**(१३) * १६७०७ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध कामासाठी देण्यात येणाऱ्या दर करारावर देण्याची पध्दत (रेट कॉंट्रॅक्ट) बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला व बालविकास मंत्रालयांतर्गत येणाऱ्या अंगवाड्यांमधील मुलांना आणि ग्रामीण भागातील महिलांना चिक्की व खिचडी पुरविण्यासाठी ८० कोटी रुपयांचे कंत्राट दर करारावर देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या पुरवठा कंपनीने गेली काही वर्षे निकृष्ट दर्जाच्या चिक्कीचा व खिचडीचा पुरवठा केला त्याच कंपनीला पुन्हा कंत्राट देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अशंतः खरे आहे.

वित्त विभागाचे शासन परिपत्रक दि.१७/०४/२०१५ च्या अन्वये कोणत्याही खरेदी करणाऱ्या अधिकाऱ्यांने रु. १ कोटी वरील खरेदी दरकरारावर न करता स्पर्धात्मक निविदेद्वारे करावी. तसेच सदर खरेदी जर वर्षभरात रु. ५ कोटी पेक्षा जास्त होत असेल तर त्यासंदर्भात स्पर्धात्मक निविदेद्वारे खरेदी करावी अशा सूचना निर्गमित केल्या होत्या. मात्र आता त्यामध्ये सुधारणा करुन दि. ३०/०६/२०१५ च्या परिपत्रकान्वये कोणत्याही खरेदी करणाऱ्या अधिकाऱ्यानी रु. ५० लक्ष वरील खरेदी दरकरारावर न करता स्पर्धात्मक निविदेद्वारे करावी. तसेच ही खरेदी जर वर्षभरात रु. २ कोटीच्या वर होत असेल तर त्यासंदर्भात निविदेद्वारे खरेदी करावी. अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना मुंबई (CSPO) दि.०८/०८/२०१२ च्या परिपत्रकान्वये निश्चित केलेल्या दराने मे.सुर्यकांता महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग या संस्थेकडून रु. ५२ कोटीची मायक्रोन्युट्रियन्ट चिक्की व रु. २३ कोटीची राजगिरी चिक्की खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर पुरवठादार संस्थेकडून यापूर्वी सन २०१२-१३ व २०१३-१४ या काळात दरकरारावर चिक्की खरेदीचे आदेश देण्यात आले होते. सदर काळात निकृष्ट दर्जाची चिक्की पुरवठा झाल्याबाबतची तक्रार या विभागाकडे प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील अनेक शाळा, अंगणवाड्या व ग्रामपंचायतीना आयएसओ प्रमाणपत्र दिल्याबाबत

**(१४) * १९२४८ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील अनेक शाळा, अंगणवाड्या व ग्रामपंचायतीना कुठलीही तपासणी, कोणतेही लेखापरिक्षण किंवा कुठल्याही निकषांची पुर्तता न करता आयएसओ प्रमाणपत्र दिल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरुर तालुक्यातील ७० ग्रामपंचायती, ७० अंगणवाड्या व १४७ प्राथमिक शाळा यांना आयएसओ मानांकन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरिष्ठ शासकीय अधिका-यांकडून हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सक्ती केली जात असल्याने तशा आदेशाची पत्रे अनेक ग्रामपंचायती व शाळांना प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) नाही.

शिरुर तालुक्यातील १९ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ४ अंगणवाडी केंद्रे व ३ ग्राम पंचायती यांना शाळा. ४ अंगणवाडी केंद्रे व ३ ग्राम पंचायती यांना आयएसओ प्रमाणपत्र हे आंतरराष्ट्रीय संस्थेकडून विहीत निकष पूर्ण केल्याने देण्यात आले आहे. तसेच उर्वरित ६२ ग्राम पंचायती, ६७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ६५ अंगणवाड्या या संस्थांना आयएसओ मानांकनासाठी प्रस्तावित केले आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जिल्हा रुग्णालयाप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१५) * २२६८९ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा व उपजिल्हा रुग्णालयात मोफत देण्यात येत असलेल्या सुमारे ४२९ प्रकारच्या औषधांमध्ये मधुमेह व रक्तदाबावरील औषधांचा देखील समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या ग्रामीण भागात मधुमेह व रक्तदाबाचे रुग्ण मोठया प्रमाणावर वाढत असुन सदरहू औषधे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असण्यावर मर्यादा असल्याने ग्रामीण भागातील रुग्ण औषधे अनियमितपणे घेत असल्याने आजार बळावत असल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु औषधे राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. मधुमेह व रक्तदाबाच्या रुग्णांसाठी ग्रामीण भागात दोन्ही आजारांवरील औषधासाठी पुरेसा साठा उपलब्ध आहे. याशिवाय आवश्यकता भासल्यास जिल्ह्यांना औषंधाच्या गरजेनुसार त्यांच्या कडे उपलब्ध असलेल्या निधीतून जिल्हास्तरावर औषधे खरेदीस मान्यता देण्यात आली आहे.

(३) मधुमेह व रक्तदाबावरील औषधे जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिल्हा सामान्य रुग्णालय जळगाव येथे प्रयोगशाळा असुनही रुग्णांना खाजगी प्रयोगशाळेतुन रक्त व अन्य तपासण्या कराव्या लागत असल्याबाबत

**(१६) * १९७३३ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बाहयरुग्ण विभागात स्वतंत्र प्रयोगशाळा असताना तेथील डॉक्टर रुग्णांना खाजगी प्रयोगशाळेतून रक्ताच्या व अन्य तपासण्या करण्याचा सल्ला देत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे जिल्हा रुग्णालयांतील डॉक्टरांची कट प्रॅक्टिस सुरु असल्याने रुग्णांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या सदंर्भात शासनाने चौकशी केली काय, त्यात काय आढळून आले, व चौकशीनुसार संबंधित दोषी डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

केलेल्या चौकशीमध्ये ही बाब आढळून आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी प्रकल्प निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याबाबत**

**(१७) * १६८५६ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने ७५ टक्के काम झालेले प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य देण्याचे धोरण आखले असून अशा प्रकल्पांची यादी तयार करण्यात येऊन कामांना सुरूवात करण्यात आली असली तरी त्या कामाची संथगती बघता ती निर्धारित कालावधी पूर्ण होण्याची शक्यता धूसर असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाना शासनाने मंजूरी दिली आहे परंतू कामांची गती वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) अमरावती प्रदेशातील अनुशेष जिल्ह्यातील प्रकल्पांना प्रथम प्राधान्य देणेचे तसेच बिगर अनुशेष जिल्ह्यातील प्रकल्प पुर्णत्वाच्या कोणत्या टप्प्यावर आहेत, याबाबतचा आढावा घेऊन प्रकल्पातून आगामी ३ वर्षात प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ शेतक-यांना मिळू शकेल, अशा प्रकल्पांना प्राधान्य देणेचे धोरण शासनाने ठरविले आहे.

अशा प्राधान्याच्या प्रकल्पांतील अडीअडचणी दूर करुन कामांना गती देणेची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागोठणे (जि.रायगड) येथील हेदवली गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुल तातडीने बांधण्याबाबत**

**(१८) * १९५३६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठण्याजवळील (जि.रायगड) हेदवली रस्त्यावरील छोट्या नदीवरील पूल कोसळून दोन वर्षे उलटूनही नविन पुल बांधण्यासंदर्भात रायगड जिल्हा परिषद प्रशासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाअभावी हेदवली, तामसोली, सावरट या गावांसह काही आदिवासीवाड्यांतील जनतेची गैरसोय होत असल्यामुळे येत्या ऐनघर ग्रामपंचायती च्या पंचवार्षिक निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा हेदवलीतील तरुण वर्गाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,
(४) उक्त पुल तात्काळ बांधण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अद्‌याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही हे खरे नाही. तात्पुरत्या स्वरुपात नळकांडी पुल (कॉजवे) बांधण्यात आला आहे. व सद्‌य:स्थितीत सदरच्या पुलावरुन रहदारी सुरु आहे.
(२) जिल्हा परिषदेकडे या संदर्भात माहिती उपलब्ध नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) व (५) नागोठण्याजवळील हेदवली गावाकडे जाण्यासाठी नवीन पुलाचे काम जिल्हा परिषद विविध योजनोंमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## रोहा (जि.रायगड) तालुक्यातील वन विभागातील रोजंदारीवरील मजूरांना कायम सेवेत घेते वेळी झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(१९) * २१७५४ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोहा (जि.रायगड) येथील शासनाच्या निर्णयान्वये रोजंदारीवरील मजुरांना कायम सेवेत नेमणूक केल्यानुसार वन विभागातील आस्थापना कक्षातील सौ.सुनिता रविंद्र कांबळे यांनी त्यांचे पती श्री.रविंद्र बापू कांबळे यांच्या मदतीने संबंधित वन मजुरांकडून पैसे घेऊन त्यांची जन्म तारीख स्वतःच्या मर्जीप्रमाणे खोटी लावून आर्थिक गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सर्व संबंधितांकडे दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास श्री.अशोक पवार यांनी संबंधित विभागाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वन मजुरांपैकी काहींचे वय आतापर्यंत ६० वर्षे झाले तरी ते सेवेत कार्यरत असून ही बाब लक्षात येताच यातील काही मंजूरांकडून बळजबरीने राजीनामे लिहून घेतल्याबाबतचा चौकशीचा वनक्षेत्रपाल, माणगाव यांनी दिनांक १६ जानेवारी २०१३ रोजी दिलेला अहवालही मुख्य लिपिकाने गहाळ केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले, व तदनुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) श्री अशोक पवार, रा.अंबेघर, पो.पिगोडा ता.रोहा, जि.रायगड यांचा सौ.सुनिता रविंद्र कांबळे यांचे विषयी तक्रार अर्ज होता.
(३), (४) व (५) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये दोषी कर्मचारी दिसून आले नाहीत.

-----------------

**परतवाडा (ता.जि.अमरावती) येथील पश्चिम मेळघाट वन विभागामधील गैरव्यवहार**

**(२०) * १६९६४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परतवाडा (ता.जि.अमरावती) येथील पश्चिम मेळघाट वन विभागामध्ये मागील अनेक वर्षापासून मनमानी कारभार सुरु असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त परिसरातील वनविभागामध्ये मागील १० वर्षापासून स्पेशल ऑडीट करण्याची आवश्यकता असून वनविषयक कामे करावयाची असल्यास केंद्र शासनाकडून ती योजना आधी मंजूर करुन त्यानंतर वनविषयक कामे करणे बंधनकारक असताना खटकाली वनवर्तुळामध्ये वर्किंग प्लॅननुसार बांबूकटाई न करता सर्वत्र बांबूकटाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने वर्किंग प्लॅननुसार बांबू कटाई न करणाऱ्या संबंधित दोषीं व्यक्तीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) पश्चिम मेळघाट वन विभागाचे महालेखाकार यांच्याकडून दरवर्षी नियमित लेखापरिक्षण होत असते. माहे जून, २०१५ मध्ये महालेखाकार यांनी मागील ५ वर्षाचे Performance Audit केलेले आहे. सन २०१३/१४ मध्ये खटकाली या वर्तुळात बांबू कुपाबाहेर काही प्रमाणात बांबू निष्कासीत झालेले आहे. तथापि, विभागात सर्वत्र अनियमितता झालेली आहे, ही बाब खरी नाही.

(३) तत्कालीन वनक्षेत्रपाल, अकोट व त्यांचे अधिनस्त वनकर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मागासक्षेत्र अनुदान निधी योजनेत हिंगोली जिल्ह्यात**
**खर्च झालेल्या निधीची चौकशी करण्याबाबत**

**(२१) * १७४६७ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा विकासासाठी मागसक्षेत्र अनुदान निधी योजनेंतर्गत सन २००९-१० ते २०१४-१५ या पाच वर्षात कोट्यावधी रुपयांचा निधी शासनाकडून प्राप्त होवून सदरहू निधीतून ग्रामीण भागात पाणी पुरवठा, रस्ते संरक्षण भिंत, अंगणवाडी इमारत इत्यादी कामे करुन घ्यायची जबाबदारी जिल्हा ग्रामीण यंत्रणेवर होती. परंतु अनेक कामे कागदोपत्री तर काही कामे अपूर्ण असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यात या प्रकल्पांतर्गत झालेल्या निधी खर्चाची चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

मागास क्षेत्र अनुदान निधी योजनेतंर्गत सन २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीत जिल्हा परिषदे हिंगोलीसाठी एकूण निधी रुपये ९०९०.०० लक्ष निधी शासन स्तरावरुन उपलब्ध करुन दिलेला आहे त्यापैकी रुपये ८०८६.८२ लक्ष योजनेवर खर्च करण्यात आला आहे. त्यामध्ये ग्रा.पं.कार्यालय बांधकाम, सांस्कृतीक सभागृह, अंगणवाडी, सार्वजनिक शौचालय, स्मशानभूमी शेड, शाळेची संरक्षण भिंत, सिमेंट रस्ते बांधकाम इत्यादी स्वरुपाची कामे घेण्यात आली आहेत.

सदरील योजनेत एकूण ३४४५ कामे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ३००७ कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच मंजूर कामापैकी सद्यस्थितीत २१० कामे अपूर्ण असून ८९ कामे रद्द करण्यात आलेली आहेत व ९४ कामे सुरु केलेली नाहीत तर ४४ कामांमध्ये अपहार झाला असून एका कामामाध्ये ग्रा.पं.चा वाद आहे. अपहार झालेल्या कामांमधील अपहारीत रक्कम रुपये ५६.३१ लक्ष पैकी रुपये ७.८७ लक्ष रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

(२) होय.

अपहार रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांचे स्तरावरुन सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डहाणू (जि.पालघर) तालुक्यात घरकूल योजनेसाठी लाभार्थ्यांकडून रक्कम घेऊन केलेला अपहार**

**(२२) * २४८९९ श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) विवळवेढे ग्रामपंचायत सदस्य भिकू कृष्णा गिंबल यांनी आदिवासी घरकुल योजनेतील लाभार्थ्यांकडून हजारोंची रक्कम घेऊन लाखो रुपयांचा अपहार केल्याचे ग्रामस्थांनी उपस्थित स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांसमोर दिनांक ६ मे, २०१५ रोजी तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गटविकास अधिका-यांनी यांची चौकशी करण्याचे आश्वासन दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) होय.

(४) श्री.भिकू कृष्णा गिंबल ग्रामपंचायत सदस्य, विवळवेढे हे दोषी आढळल्याने त्यांचेवर महाराष्ट्र अधिनियम १९५८ नुसार कलम ३९(१) नुसार ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द करणे व त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे फासा येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी श्री.आर.आर.कोळी, विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत), पंचायत समिती डहाणू यांना सुचना देण्यात आल्या आहेत. तथापि, पोलीस स्टेशनमध्ये अद्यापही

गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे गट विकास अधिकारी, डहाणू यांनी पोलीस स्टेशनमध्ये वैयक्तिक जाऊन श्री.गिंभल यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत व कलम क्र. ३९(१) नुसार कारवाई करण्याचा विहीत नमुन्यात प्रस्ताव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) यांना सादर करणेच्या सूचना जिल्हा स्तरावरुन देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उल्हासनगर (ता.जि.ठाणे) येथील बालगृहातुन अनेक मुले पळून गेली असल्याबाबत**

**(२३) * १७८५७ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (ता.जि.ठाणे) येथील शासकीय बालगृहातुन गत वर्षभरात एक डझनपेक्षा अधिक मुलांनी बालगृहाच्या तुटलेल्या कुंपणातून पळ काढला असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुले पळून जाण्याची कारणे काय आहेत व पळून गेलेल्या मुलांपैकी किती मुले सापडली आहेत,

(३) तसेच उक्त बालसुधारगृहाच्या प्रशासनाकडून वारंवार कुंपण दुरुस्तीसाठी मागणी करण्यात येत असतांनाही याकडे दुर्लक्ष केले जात होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मुलांच्या तपासाच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

सन २०१४-१५ या वर्षात वेगवेगळ्या दिवशी सदर संस्थेतून एकुण १४ मुले न सांगता निघून गेली. याबाबत विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) सदरील संस्था ही कनिष्ठ बालगृह असुन, तेथे राहणाऱ्या मुलांचा मंजूर वयोगट ६ ते १२ वर्षे असा आहे. या संस्थेचे एकूण क्षेत्रफळ २७१७० चौ.मी. आहे. त्यापैकी १३८४५ चौ.मी. बांधकाम असुन, १३३२५ चौ.मी. मोकळी जागा आहे. संस्थेची एकुण क्षमता १२५ असुन, ६० ते ६५ बालके येथे नियमितपणे हजर असतात. संस्थेचा परिसर मोठा असल्यामुळे याच संधीचा फायदा घेऊन संस्थेतील प्रवेशित निघून जातात. सन २०१४-१५ या वर्षामध्ये पळून गेलेल्या १४ मुलांपैकी ०६ मुले सापडली आहेत. उर्वरित मुलांचा शोध घेणेचे काम पोलिस विभाग करत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) ज्या वेळी संस्थेतून मुले निघून गेली त्या वेळी संस्थेतील काळजीवाहकांनी ठाणे व मुंबई परिसरातील सर्व रेल्वे स्थानके, बस स्थानके परिसर व नशा करणाऱ्या व्यक्तींचे अड्डे इ. ठिकाणी शोध घेतला असल्यामुळे ०६ मुलांचा शोध लागला. तसेच, अद्यापही संस्थेचे कर्मचारी वरील ठिकाणी नियमितपणे जावून मुलांचा शोध घेत असतात, तसेच, विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन, उल्हासनगर-४, येथे संस्थेतील मुले निघून गेल्याबाबतचे गुन्हे संस्थेमार्फत नोंद केलेले आहेत. पोलिसामार्फत मुलांचा शोध घेण्यासाठी नियमितपणे पाठपुरावा केला जातो. याचबरोबर बाल संरक्षण कक्ष, पोलीस आयुक्तालय ठाणे यानांही सदरील बाबत कळविले आहे. त्यांच्यामार्फत देखील बालकांचा शोध घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वर्षानुवर्षे गैरहजर राहणाऱ्या ५५ वैद्यकीय अधिकाऱ्यांना कामावरुन कमी करण्यात आल्याबाबत**

**(२४) * १६५६४ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.गणपत गायकवाड**

**(कल्याण पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वर्षानुवर्षे गैरहजर राहणाऱ्या ५५ वैद्यकीय अधिकाऱ्यांना कामावरुन कमी करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अधिकाऱ्यांवर गैरहजर राहण्याबाबत व त्याची माहिती वरिष्ठांना न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाद्वारे काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गैरहजर डॉक्टरांवर कारवाई करुन रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

प्रदीर्घ कालावधीपासून अनधिकृतरित्या गैरहजर असलेल्या ५५ वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासनाने दि.२३.२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सेवेतून काढून टाकले आहे.

(२) व (३) वरील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अनधिकृत गैरहजेरीबाबतची माहिती वरिष्ठांना सादर न करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

(४) व (५) स्वतंत्र निवड मंडळामार्फत एकूण ६४७ शिफारस प्राप्त उमेदवारांना एप्रिल-मे, २०१५ मध्ये वैद्यकीय अधिकारी, गट-अ या पदावर नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

-----------------

## सन २००९ ते २०१५ या कालावधीत राज्यात ८०११ मुलींचा कुपोषणामुळे मृत्यु झाल्याबाबत

**(२५) * १९४४४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुला-मुलींसाठी एकात्मिक बालविकास योजना राबविण्यात येत असून मुला-मुलींचे पोषण होणे, आरोग्य सुधारणे तसेच त्यांच्यातील मृत्युदर कमी होणे, अनारोग्य कुपोषण आणि शाळामधील गळतीचे प्रमाण कमी होत जाणे हा प्रमुख उद्देश या योजना राबविण्यामागे असताना शासनाने ग्रामीण पातळीवर आदिवासी मुलींच्या कुपोषणाकडे तसेच आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याने सन २००९ ते २०१४ या काळात कुपोषणामुळे ८०११ मुलींचा मृत्यु झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २००९ ते २०१४ या पाच वर्षाच्या काळात हि योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाकडे तब्बल ४ हजार ७३० कोटी एवढी रक्कम प्राप्त होऊनही प्रत्यक्षात योजना राबवत असताना ४ हजार २३६ कोटी एवढी रक्कम २००९ ते २०१४ या वर्षामध्ये खर्च करुनही कुपोषणामुळे ८०११ मुलींचा मृत्यु होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

मासिक प्रगती अहवालानुसार राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत असलेल्या अंगणवाडीतील ० ते १ वर्ष वयोगटातील मुलींची बालमृत्यूबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | एकूण जिवंत जन्म (० ते १ वर्ष मुली) | ०-१ वर्ष मुलींची मृत्यू | IMR | १-६ वर्ष मुलींचा मृत्यू |
|---|---|---|---|---|
| २००९-१० | ४६२७३५ | ९६९८ | २१ | ३१०७ |
| २०१०-२०११ | ४६२४०२ | ९१५० | २० | ३१४५ |
| २०११-२०१२ | ४९०२२१ | ८१९५ | १७ | २५५१ |
| २०१२-२०१३ | ४९९६१२ | ८४७८ | १७ | २२७२ |
| २०१३-२०१४ | ४९३५७५ | ७४२१ | १५ | १९९२ |
| ऑक्टोबर-२०१४ | ५७७९ | १२८ | २२ | १७२ |

वरील तपशिल पाहता बालमृत्युच्या टक्केवारीत घट झाल्याचे दिसून येते.

(२) सन २००९-२०१० ते २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात आहार खर्चांतर्गत रु. ४८५५,४२,९१,०००/- इतका निधी प्राप्त झाला असून तो पूर्णपणे खर्च देखील झालेला आहे.

सदरचे बालमृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसुन १) न्युमोनिया, २) दूर्धर आजार, ३) तिव्र ताप, ४) मलेरीया, ५) गोवर, ६) जुळे जन्म: ७) अपुऱ्या दिवसाची प्रसुती, ८) जन्मत: कमी वजन, ९) अतिसार, १०) सिकलसेल, ११) अस्थमा, १२) श्वासावरोध, १३) टि.बी., १४) काळीव, १५) डेंगुमलेरीया, १६) मेंदुज्वर, १७) रक्तक्षय (ॲनिमीया), १८) धनुर्वात, १९) डांग्याखोकला इ. विविध आजार व संसर्गजन्य आजारामुळे झालेले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कामगारांना आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या राज्य कामगार विमा रुग्णालयांच्या संचालनासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(२६) * १६४३० डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर),**

**श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्रीमती प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील राज्य कामगार विमा रुग्णालयांची (ईएमआयसी) जबाबदारी केंद्र शासन स्विकारण्यास तयार नसल्याने सदर रुग्णालयांच्या संचालनासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही अद्याप पूर्ण झाली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच हजारो कामगारांना आरोग्यविषयक सुविधा मिळाव्यात याकरिता सदर प्रश्नी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचेकडून राज्य स्तरीय राज्य कामगार विमा महामंडळ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

(२) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही त्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) सर्व संबंधित विभागाने अभिप्राय घेण्यात येत असून या प्रकरणी लवकरच निर्णय अपेक्षित आहे.

-----------------

## सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील आरोग्य विभागातील ३७ वैद्यकिय अधिकारी, कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२७) * २२९७० डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील आरोग्य विभागात ३७ वैद्यकिय अधिकारी, कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यामध्ये एकूण १०४ गावे असून तालुक्याची लोकसंख्या सुमारे १ लाख ७१ हजार ७९ एवढी असून या तालुक्यात ४ प्राथमिक आरोग्य केंद्र, ५ आयुर्वेदिक दवाखाने व २४ उपकेंद्र आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या तालुक्यात आरोग्य विभागातील पदे रिक्त ठेवण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, तथापि सध्या सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील आरोग्य संस्थामध्ये गट-अ ते गट-ड ची एकूण २७ पदे रिक्त आहेत.
(२) होय.
(३) व (४) राज्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य संस्थांमध्ये गट-अ ते गट-ड ची ३०% पदे रिक्त आहेत. तुलनेत सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील आरोग्य संस्थामध्ये गट-अ ते गट-ड ची २७% पदे रिक्त आहेत. माहे मे, २०१५ मध्ये ३ वैद्यकीय अधिकारी गट-अ यांना सिंदखेडराजा तालुक्यामध्ये नवीन नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच, वैद्यकीय अधिकारी गट-अ ची रिक्त पदे भरण्याबाबत स्वतंत्र निवड मंडळामार्फत नुकतीच जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

गट-क व ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात आलेल्या वृक्षलागवड योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२८) * २४५७० श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत यवतमाळ जिल्हा परिषदेत ग्राम पंचायतमार्फत सन २०१३-१४ अंतर्गत वृक्षलागवड योजनेमध्ये गैरव्यवहार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत खड्डे खोदणे, रोप लावणे, पाणी देणे, कुंपण लावणे व रोपे जगविणे यासाठी ग्रामपंचायतला निधी देऊन उद्दिष्टपुर्तीचे लक्ष देण्यात येवून प्रत्यक्षात ग्रामपंचायतींने वृक्ष लागवड न करता कागदावरच खर्च दाखविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक कार्यकर्ते श्री.बोरले यांनी केलेल्या तक्रारीवरुन राज्य शासनाने अमरावती विभागीय आयुक्तांना तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा), गटविकास अधिकारी यांचे चौकशीचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत ग्रा.पं. बेचखेडा (ता.यवतमाळ) मध्ये लागवड केलेल्या रोपांपैकी जिवंत झाडांचे प्रमाण कमी आढळल्यामुळे याप्रकरणी सचिव ग्राम पंचायत बेचखेडा श्री.अमोल चव्हाण यांना या पूर्वीच दि. ४/८/२०१५ ला निलंबित करण्यात आलेले आहे. श्री.संदिप आगे, कृषी तज्ञ (कंत्राटी) यांना कामावरुन कमी केले आहे.

(३) शासनाने श्री.बोरले यांच्या निवेदनात नमुद केलेल्या बाबीच्या संदर्भात उचित कार्यवाही करण्याबाबत विभागीय आयुक्त अमरावती यांनी कळविले आहे.

(४) सन २०१३-१४ मध्ये ग्रामपंचायती मार्फत करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीच्या २३५ कामात लागवड केलेल्या २६८९३१ वृक्ष लागवडीपैकी १८७ कामामध्ये केलेल्या वृक्षलागवडीची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये जिवंत झाडाचे प्रमाण ४४.८३ % असल्याचे तपासणी आढळून आले.

(५) सचिव ग्राम पंचायत बेचखेडा यांना निलंबीत करण्यात आलेले आहे तसेच कृषी तज्ञ (कंत्राटी) यांना कामावरुन कमी केले आहे. व पंचायत समितीच्या सर्व गट विकास अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटी देण्यात आली आहे.

(६) निरंक

-----------------

## नांदेड जिल्ह्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेची काम सुरु करण्याबाबत

**(२९) * १७१३० श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु नसल्यामुळे जिल्ह्यातील हजारो शेतमजुरांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार हमी योजनांतील रोजगारांचे अनुदान तात्काळ मिळावे, बंद असलेली योजना पुन्हा सुरु करावी व दुष्काळी परिस्थितीत भूमिहिन शेतकरी मजुरांच्या हाताला कामे देण्याइतपत विकास आराखड्याची कामे मंजूर असुनही जबाबदार अधिकारी व कर्मचारी सदरहू कामामध्ये व्यत्यय आणत असुन शासन भूमिहीन शेतमजुरांच्या उपासमार थांबविण्याकरिता कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** : (१) हे खरे नाही.

(२) महात्मा गांधी राष्ट्रिय ग्रामीण रोजगार हमी योजनेची सद्या राज्यात अंमलबजावणी सुरु आहे.

नांदेड जिल्ह्यात मे, २०१५ मध्ये ८५६ कामे सुरु होती व त्यावर सरासरी १३, ६४७ एवढी मजूर उपस्थिती होती, दिनांक २७/०६/२०१५ अखेर नांदेड जिल्ह्यात १३०२७ कामे शेल्फवर असून त्यांची मजुर क्षमता १७.२८ लक्ष आहे. कामाची मागणी प्राप्त होताच कामे उपलब्ध करुन देण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र व गुजरात राज्य शासनाने नर्मदा व तापी नदीतील पाणी वाटपाचा केलेला करार

**(३०) * २०१९९ श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नर्मदा जलतंटा लवादाला बाजूला ठेवून (बगल देत) महाराष्ट्र व गुजरात राज्य शासनाने नर्मदा व तापी नदीतील पाणी वाटपाचा सामंजस्य करार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नर्मदा लवादानुसार सरदार सरोवर प्रकल्पातून १०.८९ टीएमसी पाणी महाराष्ट्राला देण्याचे निश्चित असताना, महाराष्ट्राच्या हिश्यातील १०.८९ टीएमसी पाण्यापैकी तब्बल ५ टिएमसी पाणी गुजरातकडे नेले जात आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान महाराष्ट्र व गुजरात सरकारने केलेल्या सामंजस्य करारात, पुनर्वसनासह सरदार सरोवर प्रकल्पबाधितांना सिंचन सुविधा पुरविण्यात आली व उकई धरणातुन ५ टिएमसी पाणी देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्राला मिळणा-या १०.८९ टीएमसी पाण्यातील ५ टिएमसी साठा गुजरातला नेण्याचे करारात नमूद करण्यात आले आहे अशा पाणी वाटपाविषयी कुठलाही मुद्दा नर्मदा जलतंटा लवादात नसतानाही हा करार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,राज्य शासनाने तात्काळ धोरणात्मक निर्णय घेवून गुजरातला पाणी कपात करु देवू नये असे सिंचन विभागाने सुचविले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१), (२), (३) व (४) नाही.

नर्मदा जल लवादातील प्रकरण ९ कलम ३ अन्वये महाराष्ट्रास ०.२५ दशलक्ष एकर फूट म्हणजेच १०.८९ अघफू /३०८.३७ दलघमी पाणी वाटप झालेले आहे.

महाराष्ट्रातील नर्मदा खोऱ्यातील भौगोलिक परिस्थिती व वनजमिनीच्या अडचणीमुळे नर्मदा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या हक्काच्या पाणी वापरात अडचणी आहेत.

त्यामुळे तापी खोऱ्यातील उकई धरणाचे पाणी पसाऱ्यातून ५ अघफू पाणी वापरण्यासाठी महाराष्ट्रास मिळणेबाबतची विनंती दि.२३.०८.२००२ रोजी मुख्यमंत्री स्तरावरील बैठकीत करणेत आली.

तथापी या बाबतच्या सामंजस्य कराराचे मसुद्यास तत्कालीन मुख्यमंत्री यांनी अंतिमत: सप्टेबर २०१४ मध्ये सहमती दिली. यानंतर सामंजस्य करारावर दि. ७ जानेवारी २०१५ रोजी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

सदर करार हा नर्मदा खोऱ्यातील प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती तसेच तापी खोऱ्यातील पाण्याची तूट विचारात घेऊन केला असून तो शासनाच्या हिताचा आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील ४०० धरणांना धोका निर्माण झाल्याबाबत**

**(३१) * १६३६९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर),श्री.विलास जगताप (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था नाशिक अंतर्गत असलेल्या धरण सुरक्षा विषय विभागाने (डॅम सेफ्टी ऑर्गनायझेशन) राज्यातील १२२६ प्रकल्पांची माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तपासणी केली असता, भराव खचणे, धरण तळाला भेगा पडणे, धरणतळातून गळती होणे, सांडव्याच्या परिसरातील धूप होणे. दगडाचा थर खचणे अशा प्रकारच्या गंभीर त्रुटी ४०० धरणांमध्ये असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा तपासणी अहवाल डॅम सेफ्टी ऑर्गनायझेशने सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सिमेंटची धरणे अधिक कमकुवत असून काही धरणांना धोका निर्माण झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त गंभीर त्रुटीमुळे धरणाला मोठ्या प्रमाणावर धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले,

(७) असल्यास, त्रुटीची पूर्तता करण्याच्या दृष्टीने व धरणाला धोका होवू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात २३३ वर्ग-१ धरणे व ९९८ वर्ग-२ धरणे अशी एकूण १२३१ मोठी धरणे आहेत. या धरणांची दरवर्षी पावसाळापुर्व व पावासाळोत्तर तपासणी संबधित क्षेत्रीय अभियंत्यांमार्फत करण्यात येते. तसेच या १२३१ धरणांपैकी काही निवडक धरणांची चाचणी तपासणी जलसंपदा विभागाच्या मेरी अंतर्गत धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांच्या मार्फत करण्यात येते. या दोन्ही तपासण्यांच्या अनुषंगाने दरवर्षी धरणस्थिती अहवाल हा धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांच्यामार्फत प्रकाशित करण्यात येतो.

सन २०१३ च्या धरण स्थिती अहवालाप्रमाणे १२३१ मोठ्या धरणांपैकी ४०० धरणांमध्ये दुरुस्ती करण्याजोग्या व ज्याकडे त्वरीत लक्ष देणे गरजेचे आहे अशा संवर्ग-२ प्रकारच्या त्रुट्या आढळल्या आहेत.

(२) सन २०१३ मध्ये क्षेत्रिय अधिका-यांकडून केलेल्या धरणांच्या पावसाळा पूर्व व पावसाळा उत्तर तपासणी वर व धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांनी केलेल्या चाचणी तपासणी वर आधारित सन २०१३ चा धरण स्थिती अहवाल धरण सुरक्षितता संघटनेकडून माहे मे २०१४ मध्ये प्रसिध्द करण्यात आला आहे.

(३) व (४) नाही. कोणत्याही धरणांना सद्यस्थितीत गंभीर धोका निर्माण झालेला नाही.

(५) शासनस्तरावरुन सदर त्रुटींचे सत्वर निराकरण करण्याबाबत सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) शासनाने सदर त्रुटी निराकरण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून त्यावर सनियंत्रण ठेवण्यासाठी महासंचालक, मेरी यांना प्राधिकृत केलेले असून तसेच आदेश दिनांक १२/२/२०१५ रोजी दिलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाडीशेवाडी (ता.सिंदखेडा, जि.धुळे) या मध्यम प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील दिवी गावाच्या पुनर्वसनाबाबत

**(३२) * २२८०४ श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडीशेवाडी (ता.सिंदखेडा, जि.धुळे) या मध्यम प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम १०० टक्के पुर्ण झाले असून पुनर्वसनाचे काम केवळ ५० टक्के झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील दिवी गावाचे पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने ८ वर्षापूर्वी घेतला असतांना अद्यापही गावाचे पुनर्वसन झाले नसल्यामुळे दिवी गावात शासनाच्या कोणत्याही निधीचे काम करता येत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाचे 'आधी पुनर्वसन मग धरण' असे धोरण असतांना दिवी गावचे पूनर्वसन का करण्यात आले नाही, याची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) पुनर्वसनाअभावी प्रकल्पात पुर्ण क्षमतेने पाणी साठविता येत नाही त्यामुळे प्रकल्पाच्या पाण्याचा लाभ होत नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) दोन बाधित गावठाणांपैकी वाडी या गावाचे पुनर्वसित गावठाणात स्थलांतरण झालेले असून दिवी या गावातील पुनर्वसनांतर्गत नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) व (३) प्रकल्प अहवालानुसार दिवी गावाचे अंशत: पुनर्वसन प्रस्तावित होते. तथापि सुधारीत पुर अभ्यासानुसार संपूर्ण दिवी गांव बाधित होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे संपूर्ण गावाचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. १८ नागरी सुविधांपैकी ७ नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली असून उर्वरीत सुविधा जून, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) होय, सदर प्रकल्पात संकल्पीत पाणीसाठा ३३.९१ द.घ.मी. असुन निर्मित पाणीसाठी १२.५४ द.घ.मी. आहे. निर्मित पाणीसाठ्यातून पिण्याकरिता व सिंचनासाठी पाणी वापर सुरु आहे.

(५) दिवी गावांच्या पुनर्वसन गावठाणातील उर्वरित नागरी सुविधा जून, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे,

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्ह्यातील देवस्थानांना शासनाकडून देण्यात येणारी दुमाला रसद बंद करण्यात आल्याबाबत**

**(३३) * २५२१८ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोनोली तर्फ असंडोली, (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील श्री स्वामी जगदगुरु शंकराचार्य पीठ करवीर या देवस्थानाला शासनाकडून देण्यात येणारी दुमाला रसद सन २००६ पासून बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे मोरेवाडी, (ता.आजरा), मौजे हेळेवाडी, (ता.गडहिंग्लज) येथीलही देवस्थान संस्थानात दुमाला रसद देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील देवस्थानांना वर्षानु-वर्षे देण्यात येणारी दुमाला रसद बंद करण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या देवस्थानांना त्यांचा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून अन्य मार्गाने काय मदत करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) श्री.स्वामी जगदगुरु शंकराचार्य करवीर पीठाला देण्यात येणारी मौजे कोनोली तर्फे असंडोली (ता.राधानगरी) येथील दुमाला रसद सन २००६-२००७ पासून, मौजे वाटंगी पैकी मोरेवाडी (ता.आजरा) येथील दुमाला रसद सन २०००-२००१ पासून आणि मौजे हेळेवाडी, (ता.गडहिंग्लज) येथील दुमाला रसद सन २००५-२००६ पासून संबंधित तहसील कार्यालयाकडून देण्यात येत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

उक्त प्रकरणी कोणत्या परिस्थितीत व कारणास्तव सदर दुमाला रसद बंद करण्यात आली याची तपासणी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**दारिद्रय निर्मूलनासाठी निती आयोगाच्या धर्तीवर कृती गटाची स्थापना केल्याबाबत**

**(३४) * १८१८६ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे**

**(इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दारिद्रय निर्मूलनासाठी निती आयोगाच्या धर्तीवर सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवाच्या अध्यक्षतेखाली कृती गटाची स्थापना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृती गटाचे स्वरुप व कार्यकक्षा काय आहेत तसेच कृती गटाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात केव्हा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, निती आयोगाच्या निदेशानुसार दि. १७ एप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दारिद्रय निर्मुलनासाठी प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कृती गटाची स्थापना करण्यात आली होती. तथापि, त्यानंतर दि. ११ जून, २०१५ रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांना अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले.

(२) व (३) या कृती गटात एक अध्यक्ष, सदस्य म्हणून संबंधीत नऊ प्रशासकीय विभागाचे सचिव व दोन संयोजक सदस्य असे या कृती गटाचे स्वरुप आहे.

कृती गटाच्या कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहेत :-

(अ) राज्यात कोणकोणत्या बाबीवरुन दारिद्रय निर्मुलन झाल्यासारखे होईल,

(ब) दारिद्रय निर्मुलनाच्या यशस्वी कार्यक्रमात इतर राज्यांबरोबर सहभाग साधणे,

(क) राज्यात दारिद्रय निर्मूलनसाठी कोणकोणते प्रयत्न करणार आहात, जेणेकरून वरील “अ” साध्य होईल.

(ड) दारिद्रय निर्मूलनासाठी राज्यांच्या प्रयत्नांना निती आयोगाचे कशाप्रकारे सहाय्य/मदत अपेक्षित आहे,

सदर कृती गटाची बैठक दि. ३०.६.२०१५ रोजी झाली असून कृती गटाचा अहवाल निती आयोगास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**महिला व बाल विकास विभागाकडून मेडीसीन किटची**
**नियमबाह्यपणे करण्यात आलेली खरेदी**

**(३५) * २१३६६ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महिला व बाल विकास विभागाने निविदा सादर केल्यानंतर मेडीसीन किट खरेदीच्या निविदेत सोयीनुसार बदल करुन रुपये साडेतीन कोटींच्या औषधांची खरेदी केल्याची बाब दिनांक ३० मे २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, मेडीसीन किटची नियमबाहय पध्दतीने खरेदी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तद्नुषंगाने संबंधित मेडिकल किट खरेदीच्या निविदेत बदल करुन नियमबाहय औषधांची खरेदी करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) केंद्र शासनाकडून मेडिसीन किटसाठी ठरवून दिलेली खर्च मर्यादा रु.६००/- व रु.३००/- विचारात घेऊन या किंमतीमध्ये खरेदी करता येऊ शकणाऱ्या औषधींचा समावेश करुन व परिणाम कमी करुन किट A व B खरेदी करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या आर्थिक निकषाच्या मर्यादेतच मेडिसीन किट खरेदी करण्यात आलेली आहे. निविदेत याबाबींचा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयातील शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शासकीय कर्मचा-यांना अपंग असल्याची बोगस प्रमाणपत्र दिल्याबाबत

**(३६) * १७३६४ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात राज्य शासनाकडून अपंगांसाठी मिळणाऱ्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शासकीय कर्मचा-यांना अपंग असल्याबाबत बोगस प्रमाणपत्र दिले असल्याचे दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) धुळे जिल्हयातील डॉक्टरांनी शासकीय कर्मचाऱ्यांना अपंग असल्याची प्रमाणपत्रे दिल्याबाबत लोकप्रतिनिधींकडून तक्रार प्राप्त झाल्याने त्याबाबत कै.भाऊसाहेब हिरे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे व जिल्हा रुग्णालय, धुळे येथील अपंगत्वाच्या प्रमाणपत्राची तपासणी केली असता तक्रारीत प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे आढळून आल्याचे जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे.

-----------------

**वांद्री धरणाचे कालवे व उप कालवे हे मातीचे असल्याने त्यातील पाणी जमिनीत सातत्याने झिरपत राहुन शेत जमिन १२ महिने ओलीताखाली राहत असल्याबाबत**

**(३७) * २५११८ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर तालुक्यातील मौजे गांजे ढेकाळे येथील वांद्री धरणामुळे सुमारे ५००० एकर जमीन ओलीताखाली येत असून तेथे उन्हाळी व पावसाळी या दोन हंगामात भात शेती केली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वांद्री धरणाचे कालवे व उप कालवे हे मातीचे असल्याने त्यातील पाणी जमिनीत सातत्याने झिरपत राहुन शेत जमिन १२ महिने ओली राहते त्यामुळे त्या परिसरातील शेत जमिनीचा दर्जा दिवसेंदिवस कमी होऊन त्याचा दुरगामी परिणाम भाताच्या पिकांवर होत असल्याने उत्पन्न दरवर्षी घटत असल्यामुळे स्थानिक आदिवासींच्या पिकांचे नुकसान होत असून शेतजमिनीचा दर्जा चांगला टिकून राहण्यासाठी पर्यायाने शेत मालाचे उत्पन्न वाढीसाठी वांद्री धरणाचे दोन कालवे व उपकालवे याचे अस्तरीकरण करण्यात यावे याबाबतचे निवेदन मा. जलसंपदा मंत्री महोदयांकडे दिनांक २२ डिसेंबर २००९ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी केलेल्या मागणीसंबंधी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) मा.जलसंपदा मंत्री महोदयांकडे दिनांक ३.२.२०११ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत देण्यात आलेल्या निवेदनात वांद्री मध्यम प्रकल्पाच्या कालवे व उप कालव्यांना अस्तरीकरण करुन मिळणेबाबतची मागणी करण्यात आली आहे.

(३) वांद्री प्रकल्पाच्या कालव्याचे अस्तारीकरणाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत म्हैसवाडी-चिखली राजोरा (ता.यावल, जि.जळगाव) या रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३८) * २१५२९ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत म्हैसवाडी-चिखली राजोरा (ता.यावल, जि.जळगाव) या रस्त्याचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे न करता निकृष्ट दर्जाचे करुन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चिमूर तहसिल अंतर्गत (जि.चंद्रपूर) येणाऱ्या डांगली येथे सिंचन विभागाद्वारे मामा तलावाच्या विस्तारीकरणातील बाधीत शेतकऱ्यांना अद्याप मोबदला मिळालेला नसल्याबाबत**

**(३९) * २४७१५ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर तहसिल अंतर्गत (जि.चंद्रपूर) मौजे डांगली येथे सन २००२ मध्ये सिंचन विभागाद्वारे मामा तलावाच्या विस्तारणामुळे जांभुळविहिरा डांगली गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी पाण्याखाली आल्या त्यांना अद्यापही त्यांचा मोबदला मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात सिंचन विभागाच्या अधिका-यांकडे संबंधित शेतक-यांनी निवेदन माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यावेळी एक महिन्याच्या आत मोबदला देण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय अंशत: खरे असून सदरचे काम माजी मालगुजारी तलावाचे नसुन लघु पाटबंधारे तलावाचे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

एक महिन्याच्या आत भुसंपादन प्रस्ताव पुन्हा अनुपालनासह मंजुरीकरिता सादर करण्यात येईल असे आश्वासन दिले होते.

भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना दि. २७ मे, २०१५ रोजी कार्यकारी अभियंता (लघुसिंचन), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून पुन्हा सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील उभळे ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकाने केलेला गैरव्यवहार**

**(४०) * १६९२४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील उभळे ग्रामपंचायतीमध्ये तेथील ग्रामसेवकाने १४ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्यानंतर त्यांची बदली झालेल्या नांदगाव खुर्द येथील ग्रामपंचायतीमध्येही त्याने ४ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, व तद्नुषंगाने संबंधीत दोषी ग्रामसेवकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) चौकशीअंती उभळे ग्रामपंचायतीच्या सन २००७-०८ ते २००९-१० या आर्थिक वर्षाच्या लेखा परिक्षणाच्या अनुषंगाने तसेच सन २०१०-११ ते २०१२-१३ या कालावधीतील दप्तर तपासणीमध्ये रु.१०,१८,५९०/- एवढ्या किंमतीचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले आहे.

नांदगाव खुर्द ग्रामपंचायत येथे सन २०१४-१५ मध्ये रु.८,७९,३६१ एवढ्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

या कालावधीत कार्यरत श्री.जितेंद्र बबन पवार, ग्रामसेवक यांना दि. २४ जून, २०१५ पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगाव जिल्हा रुग्णालयातील सीटीस्कॅन सेंटर बंद असल्याबाबत**

**(४१) * २१७२७ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा रुग्णालयातील सीटीस्कॅन सेंटर गेल्या ५ वर्षापासून बंद असून ट्रामा सेंटरसाठी तज्ञ डॉक्टर नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा रुग्णालयात आजपर्यंत कायमस्वरुपी रेडिओलॉजिस्टची नियुक्ती न केल्याने सोनोग्राफी सेंटरही बंद असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, बाब १ व २ मधील समस्या सोडविण्याबाबत शासन तातडीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सी.टी.स्कॅन मशीन बंद आहे तथापि, ट्रॉमा केअर युनिट सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

शासन निर्णय दि. २० ऑक्टोबर, २०१४ अन्वये क्ष-किरणतज्ञ संवर्गात जिल्हा रुग्णालय जळगांव येथे पदोन्नतीने पदस्थापन देण्यात आली होती, परंतु उक्त वैद्यकीय अधिकारी सदर पदावर हजर झाले नाहीत, त्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत एकत्रित मानधनावर रेडिओलॉजिस्ट या पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) व (४) राज्यात नविन शासकीय धोरणानुसार पी.पी.पी. (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) अंतर्गत सी.टी.स्कॅन, एम.आर.आय. व एक्स-रे सेवा सुरु करण्यात येणार आहेत. त्यासाठी विप्रो.प्रा.ली. कंपनीस पुरवठाधारक म्हणून मान्यता दिली असून रेडिओ डायग्नोस्टीक सेंटर कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यादरम्यान खाजगी संस्थेबरोबर करार करुन कमी खर्चात आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मध्य वैतरणा येथे मुंबई महानगरपालिकेने केंद्र व राज्य शासनाच्या आर्थिक मदतीने उभारलेल्या धरणाबाबत**

**(४२) * २०५५६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य वैतरणा येथे मुंबई महानगरपालिकेने केंद्र व राज्य शासनाच्या आर्थिक मदतीने उभारलेल्या धरणाच्या ठिकाणी ५० मे.वॅट क्षमतेचा जल विद्युत प्रकल्प निर्माण करण्यासाठी महानगरपालिकेने मे.ट्रीगॉन कंन्सल्टंट सल्लागारांना नेमून व यासाठी कंत्राटदाराला ६० लाख ५० हजार रुपये मानधन दिल्यानंतर कंत्राटदाराने प्रकल्पासाठी प्राथमिक अभ्यास, भूगर्भीय व तांत्रिक सर्वेक्षण, आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करुन कोयना संकल्प चित्रे जलसंपदा विभागास कामाचा अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाने सदर अहवालास अद्याप मंजूरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व यासाठी अजून किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

मे.ट्रीगॉन कन्सल्टंट प्रा.लि. मुंबई यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मध्य वैतरणा धरण पायथा जलविद्युत प्रकल्पाचा २५ मे.वॅ.स्थापित क्षमतेचा तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अहवाल अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांना दि. २९.३.२०१० चे पत्राने सादर केला होता.

(२) होय, हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेस सर्वेक्षण व अन्वेषण करुन प्रकल्प अहवाल सदर करण्यास शासनाने परवानगी (Letter of Permission) दिली नव्हती. त्यामुळे प्रकल्प अहवालास मान्यता देण्याचा प्रश्न उद्भवला नाही. तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस दि. २४.६.२०१० रोजी परत केला आहे.

-----------------

## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य केंद्रातून राष्ट्रीय आरोग्य अभियानात वर्ग करण्यात आलेल्या अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याबाबत

**(४३) * २२९३९ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य केंद्रातून राष्ट्रीय आरोग्य अभियानात वर्ग करण्यात आलेल्या १०,००० (दहा हजार) कर्मचाऱ्यांपैकी २५६२ कर्मचारी अतिरिक्त झाल्याचा अहवाल माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात राज्य आरोग्य संशोधन सेंटरने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीचे संकट येऊ नये म्हणून सदर कर्मचाऱ्यांचे समायोजन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मानव संसाधन सुसूत्रिकरण करण्यात आले असून संबंधित विभाग प्रमुख यांच्या समितीने कामाचे स्वरुप लक्षात घेऊन आवश्यकता नसलेली ६०० पदे कमी करण्याची शिफारस केली. त्यानुसार सदर ६०० पदांपैकी २१२ रिक्त पदे रद्द करुन उर्वरीत ३८८ पदांपैकी ३३४ पदांवरील कार्यरत

कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत रिक्त असलेल्या पदांवर समायोजन करण्यात आले असून कोणत्याही कर्मचाऱ्यास कमी करण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**म्हैसाळ उपसा सिंचन योजना (ता.जत, जि.सांगली)**
**निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) * २४६८६ श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यासाठी कृष्णा नदीचे पाणी नेण्यासाठी सुरु केलेली म्हैसाळ उपसा सिंचन योजना निधी अभावी गेली २० वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना राबवित असताना निधी वाटपामध्ये नियमांचा भंग करुन जत तालुक्यावर अन्याय केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेची अपुर्ण कामे पुणे करण्यासाठी शासन काय उपाययोजना करीत आहे,

(४) असल्यास, कामे पुर्ण करण्यासाठी निधी केव्हापर्यंत उपलब्ध होणार आहे,

(५) तसेच तालुक्यातील तलाव भरण्याची योजनेची बाबतची कार्यवाही अद्यापपर्यंत किती पूर्ण झाली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे, म्हैसाळ योजनेचे जत भागातील कामांची सुरुवात १९९९ साली झाली असून निधीच्या उपलब्धतेनुसार जत भागातील कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) नाही.

(३) निधीच्या उपलब्धतेनुसार म्हैसाळ योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेसाठी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकीय तरतूद रु.५६.०० कोटीमधून जत भागासाठी अंदाजे रु.२२.०० कोटी इतक्या निधीची कामे नियोजित आहेत.

(५) जत तालुक्यातील तलाव भरण्याची स्वतंत्र योजना सादर झालेली नाही. तथापि कृष्णा कोयाना उपसा सिंचन प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालानुसार ३ मध्यम प्रकल्प, १६ लघुपाटबंधारे तलाव व पाझर तलाव पावसाळी हंगामात अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यास काही अंशी पाणी सोडण्याचे प्रस्तावित आहे. सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत ४८ तलावात एकूण ७८२.१५ द.ल.घ.फू इतका पाणी साठा करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मेळघाट (जि.अमरावती) येथे कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू**

**(४५) * १७४३७ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात कुपोषण व त्यामुळे होणारे बालमृत्यूंची संख्या मोठी असून या मेळघाट परिसरात स्त्रीरोगतज्ञ व बालरोग तज्ञ नसल्याने कुपोषित बालकांना योग्य वैद्यकिय उपचार व औषधे मिळत नाहीत, परिणामी त्यांचा मृत्यू होत असल्याचे दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला व बालकल्याण विभागाच्या एका अहवालानुसार मेळघाट परिसरात दरवर्षी सरासरी ५०० हून अधिक बालमृत्यु होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मेळघाटातील कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

उप जिल्हा रुग्णालय, धारणी व ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा येथे प्रत्येकी १ याप्रमाणे बालरोगतज्ञ कार्यरत आहेत, मात्र चुरणी ग्रामीण रुग्णालयातील बालरोगतज्ञाचे पद रिक्त आहे. तसेच या तीनही रुग्णालयात स्त्री रोगतज्ञांचे पद रिक्त आहेत हे खरे आहे.

मेळघाट भागात आजारी बालकांवर उपचार करण्यासाठी सर्व आरोग्य संस्थामध्ये औषधीसाठा उपलब्ध असून उप जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व प्राथमिक आरोग्य पथक तसेच भरारी पथकातील मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत वेळोवेळी आजारी बालकांवर उपचार करण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

मेळघाट परिसरातील बालमृत्यचे प्रमाण दरवर्षी कमी झाल्याचे आकडेवारीवरुन दिसुन येते. मेळघाट परिसरात बालमृत्यू सन २०१०-२०११ मध्ये ५०९ होते तर सन २०१३-१४ मध्ये ३३८ व सन २०१४-१५ मध्ये ३४४ असे कमी झाल्याचे दिसून येते.

(३) शासनामार्फत जननी शिशू सुरक्षा योजना, जननी सुरक्षा योजना, भरारी पथक योजना, मातृत्व अनुदान योजना, ग्राम बाल विकास केंद्र, उप जिल्हा रुग्णालय धारणी येथे पोषण पुनर्वसन केंद्र इत्यादी योजनेच्या माध्यमातून उपाययोजना करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यात कृषी विभागाने जलसंधारणाच्या कामात केलेला गैरव्यवहार

**(४६) * २२०२२ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात कृषी विभागाने केलेल्या जलसंधारणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ मध्ये ११ गावात शेततळी व अनुषंगिक कामे घेण्यात आली असून ही कामे करत असताना अंदाजपत्रके न देताच केवळ तोंडी सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेततळे काढण्यासाठी ८२ हजार रुपयांची तरतूद असून यातील केवळ ५० हजार रुपयेच कंत्राटदाराला देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची व अद्यापी अपूर्ण अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार गैरव्यवहारास जबाबदार असणा-या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही, तथापि, शिवसेना जिल्हा प्रमुख यांनी दिनांक २५ मे २०१५ रोजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कोल्हापुर या कार्यालयास निवेदन दिले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) शिवसेना जिल्हा प्रमुख यांचे दिनांक २५.५.२०१५ च्या निवेदनानुसार उपविभागीय कृषि अधिकारी, करवीर यांचे समितीमार्फत चौकशी केली असुन त्यांना त्यात तथ्य आढळून आले नाही. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मा.पालकमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अध्यक्षतेखाली चौकशी पथक नेमण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या पवनचक्की कंपन्याकडे वार्षिक ग्रामपंचायत कराची थकबाकी असल्याबाबत

**(४७) * २५६५९ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या पवनचक्की कंपन्याकडे सन २०१० पूर्वीचा सुमारे साडेतीन कोटी रुपयांचा वार्षिक ग्रामपंचायत कर थकबाकी असल्याचे माहे मार्च, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. सांगली जिल्ह्यातील ३ तालुक्यांमधील २८ ग्रामपंचायतींच्या हद्दीतील पवनचक्क्यांची सन २०१० पुर्वीची एकूण थकबाकी रक्कम रु.३,७४,८३,३६४/- इतकी आहे.

(२), (३) व (४) उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २२ ऑक्टोबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयापुर्वीची कर आकारणी काही पवनचक्की कंपन्यांना मान्य नाही. काही पवनचक्की कंपन्यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका अद्याप प्रलंबित असल्यामुळे कर वसुलीवर परिणाम झाला आहे.

जिल्हाधिकारी, सांगली यांचे कक्षामध्ये कर वसुलीबाबत कंपनी प्रतिनिधींशी बैठक घेण्यात आली असून, गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पं.) यांचे आढावा बैठकीमध्ये कर वसुलीबाबत सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. संबंधित पवनचक्की कंपन्यांना कर भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले असून, सरपंच, ग्रामसेवक यांनाही कर वसुलीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**पालघर जिल्ह्यातील डहाणू, विक्रमगड, जव्हारच्या आदिवासी बहुल भागात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतंर्गत झालेला गैरव्यवहार**

**(४८) * १७५८४ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू, विक्रमगड, जव्हार (जि.पालघर) आदिवासी बहुल भागात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी (मनरेगा) योजनेतंर्गत चर खोदणे, बुरुज, बांधबंदिस्ती, स्मशानभूमी, नर्सरी उभारण्याचे कामांमध्ये बनावट हजेरीपटाद्वारे काम पूर्ण झाल्याचे दाखवून गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पालघर जिल्ह्यातील सुरु असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या कामातून सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी विभाग, वन विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सुमारे दीड कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर जिल्हाधिकारी यांनी फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिनांक १२ मे, २०१५ रोजी दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजेंतर्गत जव्हार (जि.पालघर) तालुक्यामध्ये सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षातील कामांच्या सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेदरम्यान झालेल्या जनसुनावणीमध्ये रु.३५,९३,९२१/- इतक्या रक्कमेच्या कामांबाबत अपहार झाल्याचा अहवाल सामाजिक अंकेक्षण पथकाने जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे सादर केला आहे.

तथापि डहाणू व विक्रमगड (जि.पालघर) या तालुक्यांमध्ये अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) होय.

प्रस्तूत प्रकरणी तहसिलदार जव्हार व गटविकास अधिकारी, पंचायत समिती जव्हार यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) या प्रकरणी सकृतदर्शनी दोषी आढळून आलेले अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

(अ) संबंधित ३ ग्राम रोजगार सेवक यांचेवर पोलीस स्टेशन जव्हार येथे दि.१६.५.२०१५ रोजी गुन्हा रजि.क्र.१-४०/२०१५ व क्र.१-४१/२०१५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(ब) पोष्टमन, साकुर, ता.जव्हार यांचे विरुध्द फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिले आहेत.

(क) संबंधित शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सेवेतुन निलंबित करण्यात आले आहे.

(ड) १ कृषी सहाय्यक यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच १ वनरक्षक व १ वनपाल यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. या चौकशीमध्ये दोषी आढळून आल्यास त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात येईल.

(ई) गट विकास अधिकारी, पंचायत समिती जव्हार यांना विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयातील समस्या

**(४९) * १९५९६ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तज्ञ व कर्मचाऱ्यांची कमतरता, महत्वाची औषधे व साधन सामुग्रीची सातत्यपूर्ण कमतरता, धर्मशाळा, कॅन्टीन, वैद्यकीय तज्ञांकरिता निवासस्थाने, रुग्णालयातील अन्य सुविधाची कमतरता, क्षयरोग रुग्णांकरिता स्वतंत्र रुग्णालय आदि मुलभूत समस्या असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी व त्यानंतर अनेक वेळा मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना पत्रव्यवहार करुनही अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त समस्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासकीय रुग्णालयात तात्काळ सर्व सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) रत्नागिरी जिल्हयामध्ये १ जिल्हा रुग्णालय, ३ उप जिल्हा रुग्णालय आणि ८ ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहेत. सदर ठिकाणी महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (वर्ग-१) संवर्गातील ३० पदे मंजूर असून ७ पदे भरलेली होती. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची ९७ पदे मंजूर असून ७४ पदे भरलेली आहेत व २३ पदे रिक्त आहेत. गट-क संवर्गाची एकूण ४३२ पदे मंजूर असून त्यापैकी ३१३ पदे भरलेली व ११७ पदे रिक्त आहेत. गट-ड संवर्गाची एकूण २५१ पदे मंजूर असून त्यापैकी २०० पदे भरलेली व ५१ पदे रिक्त आहेत.

रुग्णालयात क्ष किरण, सोनोग्राफी, प्रसुती, मोठ्या शस्त्रक्रिया आदी सुविधा उपलब्ध आहेत. औषधांचा साठा पुरेश्या प्रमाणात असून रुग्णांची औषधांविना गैरसोय होत नाही. धर्मशाळा वा कॅन्टीन उपलब्ध आहे. क्षयरोगाकरीता स्वतंत्र कक्ष उपलब्ध आहे. अधिकारी व कर्मचाऱ्याकरीता निवासस्थाने बांधण्याचे काम चालू आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधीं कडून क्षयरोग रुग्णांसाठी स्वतंत्र रुग्णालय स्थापन करण्याबाबतचे मागणी पत्र दि.२४.०३.२०१५ रोजी प्राप्त झाले आहे. याबाबत संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५०) * १८०८३ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.संजय कदम (दापोली), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अजय चौधरी (शिवडी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील लोकांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी गेल्या दीड वर्षापासून १८०० डॉक्टरांची सुरु केलेली भरतीप्रक्रिया अद्यापही पूर्ण न झाल्यामुळे ग्रामीण भागातील ग्रामस्थ केवळ प्रशासनाच्या अनास्थेमुळे आरोग्य सेवेपासून वंचित राहिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या भरती प्रक्रियेचे काम पुण्यातील ज्या संस्थेला देण्यात आले होते त्या संस्थेने भरती प्रक्रियेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार केल्याने भरती व नियुक्ती करण्यास विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच भरती प्रक्रिया पूर्ण करुन तातडीने डॉक्टरांची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील १८८१ रिक्त पदे भरण्याबाबत स्वतंत्र निवड मंडळामार्फत जाहिरात देण्यात आली होती. त्याअनुषंगाने माहे एप्रिल, २०१४ ते माहे मे, २०१५ या कालावधीत एकूण १४५० वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती देण्यात

आली आहे. त्यापैकी १२०८ वैद्यकीय अधिकारी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाले आहेत. अपेक्षीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध न झाल्यामुळे २८७ पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली आहे. उपरोक्त १४५० पदस्थापनेपैकी ४५७ वैद्यकीय अधिकारी प्रत्यक्ष आदिवासी व नक्षल भागातील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) भरती प्रक्रिया पूर्ण झाली असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्ह्याच्या शासकीय कोषागारात कुटुंब निवृत्ती वेतनात झालेला गैरव्यवहार**

**(५१) * २२०९० श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्याच्या शासकीय कोषागारात कुटुंब निवृत्ती वेतनाचा गैरव्यवहार दिनांक १२ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहार करणा-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सदरच्या गैरव्यवहार दि.२२.१२.२०१४ रोजी निदर्शनास आला, हे खरे आहे.

(२) होय, सदर प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे.

(३) सदर चौकशीत श्रीमती उपासना सु.कंगाले, लेखा लिपीक (निवृत्ती वेतन शाखा), कोषागार कार्यालय नागपूर यांनी संगणकीय प्रणालीत पासवर्डचा गैरवापर करुन नऊ कुटुंब निवृत्तीवेतन धारकांच्या संगणकीय प्रणालीत पी.पी.ओ मध्ये व बँक खात्यात अनधिकृत बदल करुन रु.२०,६९,८५४/- इतकी रक्कम स्वत:चे जवळचे नातेवाईकांच्या बँक खात्यात जमा केल्याचे निदर्शनास आले. तसेच सदर प्राथमिक चौकशीत अपर कोषागार अधिकारी व पर्यवेक्षीय कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सदर प्रकरणी अपहार होण्यास वाव मिळाल्याचे निदर्शनास आले.

(४) सदर गैरव्यवहारामधील श्रीमती कंगाले, लेखा लिपीक यांच्याविरुध्द भा.दं.वि. अंतर्गत कलम ४२०, ४०६, सहकलम ४३ (अ) ६६, ६६ (ड) व माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस पुढील तपासणी करीत आहेत.

सह संचालक, लेखा व कोषागारे, नागपूर यांच्या दि.२४.१२.२०१४ च्या आदेशान्वये श्रीमती कंगाले यांना तात्काळ निलंबित करण्यात आले असून सह संचालक, लेखा व कोषागारे, नागपूर यांच्या दि.२५.०२.२०१५ च्या आदेशान्वये श्रीमती कंगाले यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

प्राथमिक चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून श्री.दा.मो.चव्हाण, अपर कोषागार अधिकारी यांना या प्रकरणी जबाबदार धरुन त्यांना शासन आदेश दि.२४.०६.२०१५ अन्वये निलंबित करण्यात आले असून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील सहाय्यक विक्रीकर आयुक्तास लाच घेताना रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी पकडल्याबाबत**

**(५२) * १७९९१ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सहाय्यक विक्रीकर आयुक्त रामदास शिंदे व त्यांच्या अन्य साथीदारांना पनवेल येथील बांधकाम व्यावसायिकाला बनावट नोटीस पाठवून त्याचे कडून रुपये २० लाखांची लाच घेताना रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास पकडण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय.

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही. श्री.रामदास पाराजी शिंदे, विक्रीवर सहआयुक्त यांनी आरोपी क्र. २ इरफान भोपाळी यांच्यामार्फत २० लाख रुपये लाचेची रक्कम स्विकारली. त्यामुळे त्यांच्याविरुध्द दिलेल्या फिर्यादीवरुन त्यांचेविरुध्द पनवेल शहर पोलीस ठाणे कॉ.गु.र. नं.१२/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, ८, १३ (१) (ड) सह १३(२) सह भा.दं.वि. कलम ४६५, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे दोघांविरुध्द दि.११.०५.२०१५ रोजी ००.३० वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, वरील दोन्ही आरोपी यांना ००.३५ वा. नमूद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

(२) व (३) पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग यांच्या अहवालानुसार श्री.रामदास पाराजी शिंदे, विक्रीकर सहआयुक्त यांचेवर लाच स्विकारल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम भाग-२ मधील नियम ४ (२) (अ) मधील तरतुदीनुसार श्री.शिंदे यांना अटकेच्या दिनांकापासून म्हणजेच दि.११.०५.२०१५ पासून शासन आदेश दि.०६/०६/२०१५ अन्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान योजनेबाबत**

**(५३) * १६६६० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान योजना दिनांक ३१ मे, २०१५ पासून बंद करण्याच्या निर्णय राज्य शासनाने घेतल्यामुळे राज्यातील ७५७ अभियंत्यासह १५७० कर्मचाऱ्यांची सेवा संपुष्टात येणार असल्याची माहिती दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना बंद झाल्यास राज्यातील ७५७ अभियंत्यासह १५७० कर्मचा-यांवर बेकारीची कु-हाड कोसळुन उपासमारीची वेळी येणार असल्याने त्यांच्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना बंद करण्याचे कारणे काय आहे,
(४) असल्यास, राज्यातील ७५७ अभियंत्यासह हजारो कर्मचा-यांची नोकरी जाणार असल्याने त्यांची पर्यायी व्यवस्था शासनाने केली आहे काय वा करणार आहे,
(५) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) सदरची योजना ही ७५:२५ केंद्र पुरस्कृत असून योजनेसाठी केंद्र शासनाने चालू अर्थसंकल्पात (सन २०१५-१६) तरतूद ठेवलेली नसल्याने या योजनेचे स्वरुप बदलावे लागले आहे. त्यामुळे नविन कामे सुरु न करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच सदर अभियंत्यांच्या नियुक्त्या ह्या करारतत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या व आवश्यकतेनुसार कधीही संपुष्टात आणता येऊ शकतील असे त्यांच्या नियुक्ती आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या योजनेखाली सदर अभियंत्यांची गरज राहीली नसल्याने त्यांच्या सेवा समाप्त करण्यात आलेल्या आहेत.
(४) चालू आर्थिक वर्षापासून सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून आर्थिक तरतूद उपलब्ध होणार नसल्याने कंत्राटी अभियंत्यांच्या सेवा संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला आला आहे. त्यामुळे पर्यायी व्यवस्था करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सदर प्रकरणी औरंगाबाद उच्च न्यायालय येथे रिट पिटीशयन क्र.५९२०/२०१५ दाखल करण्यात आलेले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी २५ हजार कोटींचे कर्जरोखे उभारण्याचा शासनाचा निर्णय

**(५४) * १७२२३ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा**

**कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी २५ हजार कोटींचे कर्जरोखे उभारण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यावरील कर्जाच्या बोजापोटी वर्षासाठी सुमारे २५ हजार कोटी व्याजाचा भरणा करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जरोखे केव्हा उभारण्यात येणार आहेत व किती किंमतीचे उभारण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, कर्जरोखे उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात अनेक खासगी डायलेसीस केंद्रामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत गरीब रुग्णांना उपचार नाकारण्यात आल्याबाबत

**(५५) * १६७०८ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात अनेक डायलेसीस केंद्रामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत गरीब रुग्णांच्या उपचारासाठी ६० टक्के निधी येतो, परंतू सदर निधी वेळेत मिळत नसल्याने अनेक रुग्णांना डायलेसिस केंद्रामध्ये उपचार नाकारण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोरीवली येथील मागाठाणे व साईबाबा नगरमध्ये जैन फाऊंडेशन तर्फे डायलिसीस केंद्र सुरू करण्यात आले. परंतु या संस्थेकडून गरीब रुग्णांना डावलले जात असून "राजीव गांधी जीवनदायी" योजनेचा लाभ घेणाऱ्या रुग्णांना सेवेचा लाभ ही संस्था देत नसल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच डायलेसिस केंद्रावर राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत गरीब रुग्णांना लाभ मिळावा याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत, मुंबई शहरात आतापर्यंत ३० डायलेसीस सेंटर अंगीकृत करण्यात आली असून त्यामधून ३४१४० रुग्णांवर डायलेसीसचे उपचार करण्यात आले आहेत.

(२) बोरीवली येथील मागाठाणे व साईबाबा नगरमध्ये जैन फाऊंडेशन तर्फे चालविण्यात येणारी डायलेसीस केंद्रे दि. १५ सप्टेंबर, २०१२ पासून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत करण्यात आली आहेत. आतापर्यंत सदर केंद्रांकरिता अनुक्रमे १६७७ व १६३५ प्रिऑथ मंजूर करण्यात आले. त्यापैकी १६७१ व १७३४ रुग्णांवर डायलेसीसचे उपचार करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोहयो अभियानातुन विहिर पुर्नभरणाचा कार्यक्रम हाती घेण्याबाबत

**(५६) * १९२५२ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अभियानातून विहिर पुर्नभरणाचा महत्वाकांक्षी उपक्रम अकोला जिल्हा प्रशासनाकडून सन २०१४-१५ मध्ये हाती घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्हा परिषद कृषी विभागाच्या माध्यमातून विहिर पुर्नभरणाचा उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-१५ मध्ये अकोला जिल्ह्यामध्ये ४८४ कामांचे ले-आऊट आखून ३०६ विहिरींचे पुर्नभरण करण्यात आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतक-यांची मागणी व गरज पाहता राज्यभर मनरेगाच्या माध्यमातून विहिर पुर्नभरण कार्यक्रम हाती घेणेबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात विहीर पुर्नभरणाची कामे घेण्याबाबत शासनाने सविस्तर सुचना दिनांक २७ मे, २०१५ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या आहेत.

-----------------

## राज्यातील परिचारिकांच्या समस्या

**(५७) * १९७३४ श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: जळगाव व सोलापूर जिल्हयात परिचारिकांची संख्या कमी असणे, परिचारिकांच्या कामांच्या तासांची निश्चिती नसणे, एकाच पदावर काम, पदोन्नती नाही, खासगी रुग्णालयात किमान वेतनाचा अभाव अशा अनेक समस्यांना परिचरिकांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन हजार लोकसंख्येमागे एक परिचारिका तसेच एक किंवा दोन गावे देण्याची परिचारिका संघटनांची मागणी असतानाही प्रत्यक्षात मात्र त्यांना पाच ते सात हजार लोकसंख्येमागे एका परिचारिकेला काम करावे लागत असून परिचारिकेकडे चार ते पाच गावे दिली जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिचारिकांना आरोग्य यंत्रणेच्या माता बाल संगोपन, कुटूंब कल्याण, अंधत्व निवारण, जननी सुरक्षा योजना, जननी शिशू योजना, क्षयरोग नियंत्रण, कुष्ठरोग निर्मूलन अशा महत्वाच्या कार्यक्रमाची कामे, शिवाय लसीकरण, किशोरवयात मुलींना प्रशिक्षण, मानाच्या बैठका, गर्भवती महिलांना प्रसुती इत्यादी सेवा देण्याची जबाबदारीही परिचारीकांवर असल्याने त्यांना अतिरिक्त काम करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परिचारिकांच्या समस्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने परिचारिकांच्या समस्या सोडविण्याबाबत तसेच परिचारिकांची नियुक्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

राज्यात एएनएमची नियमित व कंत्राटी अशी एकूण १७७७६ पदे मंजूर असून त्यापैकी १६२९७ पदे भरलेली आहेत. जळगाव जिल्हा परिषद स्तरावर ६४४ मंजूर पदांपैकी ४६५ भरलेली व सोलापूर जिल्हापरिषद स्तरावर ७६६ पैकी ७२५ पदे भरलेली आहेत.

शासनाच्या धोरणानुसार आदिवासी भागामध्ये ३००० लोकसंख्या व बिगर आदिवासी भागामध्ये ५००० लोकसंख्येला एक उपकेंद्र मंजूर आहे. प्रत्येक उपकेंद्रात एक नियमित एएनएम असून ज्या ठिकाणी प्रस्तुती होतात त्या उपकेंद्रात कंत्राटी एएनएम मंजूर आहेत. त्यामुळे प्रत्येक एएनएमला सरासरी २-३ गावे येतात.

MPW patern (बहुउद्देशिय पॅटर्न) संपूर्ण राज्यात लागत करण्यात आलेली असून त्यानुसार ही सर्व कामे उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील कर्मचारी यांचेवर सोपविण्यात आलेली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोहाचीवाडी (नेरळ) (ता.कर्जत, जि.रायगड) येथील अंगणवाडीच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असण्याबाबत**

**(५८) * २२४८६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीमध्ये असलेल्या मोहाचीवाडी येथील अंगणवाडीच्या केवळ ५ वर्षापूर्वी बांधलेल्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी शाळेमध्ये त्या भागातील ३० बालके पोषण आहार घेण्यासाठी येत असून शाळेत जीव मुठीत घेऊन बसत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तदनुषंगाने अंगणवाडीच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

मोहाचीवाडी नेरळ येथे ५ वर्षापूर्वी अंगणवाडी बांधण्यात आली होती. सदर अंगणवाडी बांधण्यासाठी निवडण्यात आलेली जागा ही टेकडीवर आहे. तेथे अंदाजे ५० ते ६० मीटर अंतरावर पाणी पुरवठा करणारी टाकी आहे. सदर टाकीतून जादा झालेले पाणी अंगणवाडी जवळ जमिनीत मुरत असल्यामुळे लगतचे विट बांधकाम सतत भिजल्यामुळे कमकुवत होऊन खचले आहे.

सदरचे ठेकेदार ग्रामपंचायत नेरळ यांनी स्वखर्चातून अंगणवाडी नवीन इमारत बांधकाम करण्याची तयारी दर्शविली आहे. तसे पत्र पंचायत समिती कर्जत कार्यालयास सादर केले आहे.

(२) हे खरे नाही.

सध्या ग्रामपंचायतीने ३० बालकांची दुस-या जागेत/खोलीत बसण्याची व्यवस्था केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बडनेरा (जि.अमरावती) येथील शासकीय जमीनीवर अनधिकृतपणे झोपडपट्ट्या बांधण्यात येत असल्याबाबत**

**(५९) * १६९६६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेरा (जि.अमरावती) येथील शासकीय जागेवर झोपडपट्टी दादांकडून अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी बांधण्यात येत आहे त्याचप्रमाणे अंजनगाव-बारी ग्रामपंचायतच्या ७ एकर शासनाच्या मोकळ्या जागेवरही झोपडपट्टीदादांनी अनधिकृतपणे झोपड्या बांधण्यात आल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत झोपड्या बांधणा-या झोपडपट्टीदादांवर कारवाई करण्याबाबत तसेच अनधिकृत बांधण्यात आलेल्या झोपड्या हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

बडनेरा येथील शासकीय जागेवर झोपडपट्टी दादांनी मोठ्या प्रमाणात एप्रिल, २०१५ मध्ये अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले नसल्याचे जिल्हाधिकारी, अमरावती यांनी कळविले आहे.

ग्रामपंचायत अंजनगांव बारी येथील अतिक्रमण शासकीय जागेवर नसुन खाजगी जागेवर असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांनी कळविले आहे.

(२) ग्रामपंचायत व पोलीस यांनी अतिक्रमणधारकांशी चर्चा करुन अतिक्रमण धारकांनी स्वत:हुन अतिक्रमण काढल्याचे सरपंच व उपसरपंच यांचे बयानावरुन दिसुन येत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**ठाणे व पालघर जिल्ह्यातील बालकांना निकृष्ट पोषण आहार देण्यात येत असल्याबाबत**

**(६०) * १६५६७ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील अंगणवाडयांमधील हजारो बालके अजूनही दर्जेदार पोषण आहारापासून वंचित असून पूरक पोषण आहार योजनेमार्फत बालकांना दिले जाणारे कडधान्य, लापशी, खिचडी, भाज्या निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अन्नाची वर्षातून किमान दोनदा तरी तपासणी करावी, असे बंधनकारक असताना प्रत्यक्षात अशा प्रकारची तपासणीच होत नाही तसेच जे महिला बचत गट पूरक पोषण आहार पुरवितात त्यांना अन्न व प्रशासन विभागाचा गुमास्ता परवाना घेणेही आवश्यक आहे पण ठाणे व पालघर जिल्ह्यातील केवळ ५० टक्केच महिला बचत गटांनी अशा प्रकारचे परवाने घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे, खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

अंगणवाडी केंद्रातील ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना सकाळचा नास्ता व गरम ताजा आहार महिला बचतगट/महिला मंडळ/ग्रामसमुदाय यांचेकडून पुरवठा केला जातो. सदर अन्नाची वर्षातून किमान दोनदा प्रयोगशाळेमार्फत तपासणी करुन घेणे व्यवहार्य नसल्यामुळे या तरतूदीमध्ये दि. ३१ ऑक्टोबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्यात कार्यरत अंगणवाडी केंद्राच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय प्रयोगशाळा उपलब्ध नसल्याने तसेच गरम ताजा आहार हा काही कालावधीत नाशवंत होत असल्यामुळे त्यांची साठवणूक करण्याची सोय अंगणवाडी प्रकल्प अथवा जिल्हास्तरावर नाही. अशा परिस्थिती प्रत्येक पुरवठाधारकाच्या गरम ताजा आहाराची वर्षातून दोन वेळा प्रयोगशाळेतून तपासणी करुन घेणे व्यवहार्य नाही.

आहाराची तपासणी करण्यासाठी अंगणवाडी परिक्षेत्रातील १० सदस्यांची माता समिती गठीत करुन आहार पाककृतीप्रमाणे आहे किंवा नाही याबाबत तपासणी करणेचे निर्देशित केलेले आहे. त्यामुळे बचतगटांची देयके माता समितीच्या अहवालाशिवाय अदा केली जात नाही. ठाणे व पालघर जिल्ह्यातील ११९७ बचत गटांनी परवाने घेतले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी सेविकांना मानधन मिळणेबाबत**

**(६१) * १६४४९ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजय कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.बच्चू कडू**

**(अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे दोन लाख अंगणवाडी सेविका व मदतनिसांना मानधन वाढ व दिवाळी भेट मिळावी यासाठी सोलापूर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना मानधन वाढ व दिवाळी भेट देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सोलापूर जिल्ह्यातील अंदाजे एक हजार अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी मानधनवाढ व भाऊबीज दिवाळी भेट मिळावी म्हणून जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर दिनांक ०२/०३/२०१५ रोजी धरणे आंदोलन केलेले आहे.

(२) अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना मानधन वाढ व भाऊबीज भेट देण्याकरिता चालू अधिवेशनामध्ये पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मौजे फुलसावंगी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील जंगलातून होत असलेली अवैध सागवान वृक्षतोड**

**(६२) * २४५७४ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिव रेड्डी बोदकुरवार :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे फुलसावंगी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील जंगलातून सागवान वृक्षांची मोठ्या प्रमाणात अवैधरित्या कत्तल करुन लगतचे राज्यातील तेलंगणासह मराठवाड्यात वाहतूक केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर व जानेवारी, २०१५ या महिन्यात फुलसावंगी वनवर्तुळांतर्गत बोरगाव व चिल्ली जंगलातून मोठ्या प्रमाणात सागवानाची तस्करी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिल्ली बिट कक्ष क्र. ५४ मधील जंगलातून दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी अवैधरित्या सागवनांची कत्तल केलेल्या एका वाहनास निर्मल डिव्हीजन मधील बिदरली चेक पोस्टवर वाहनासह चालक विठ्ठल माने यांना पकडण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणात तस्करांसोबत वन कर्मचा-यांचे हितसंबंध असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याचे निर्देशनास येत असून शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व तद्नुषंगांने सागवानाची तस्करी करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) पुसद वनविभागातील महागांव वनक्षेत्रातील फुलसावंगी वर्तुळाच्या जंगलातुन सागवान वृक्षाची अवैधरित्या तोड करुन तेलंगणा राज्यात वाहतुक झाल्याच्या केवळ दोन घटना सन २०१४ मध्ये निदर्शनास आल्या आहेत.

(२) सप्टेंबर-२०१४ मध्ये महागांव वनपरिक्षेत्रातील फुलसावंगी वर्तुळाच्या बोरगाव बिटामध्ये दि.६.९.२०१४ रोजी ३३-सागवृक्षांची अवैधतोड करुन (नुकसानी किंमत रु.९०,१२६/-) व दि.२४.१२.२०१४ रोजी चिल्ली बिटचे कक्ष क्रमांक ७५४ मध्ये १३ सागवान वृक्षाची अवैधरित्या तोड करुन (नुकसानी किंमत रु. ३६७८७/-) त्यातील काही माल तेलंगणात वाहतूक केल्याची घटना निदर्शनास आली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणात तस्कराबरोबर वनकर्मचाऱ्याचे हित संबंध असणे आणि शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडणे ह्या बाबी खऱ्या नाहीत.

(५) होय.

बोरगांव बिट मधील अवैधरित्या ३३ सागवृक्षांचे तोडीमुळे ४.३९३ घ.मि.नुकसानी किंमत रु. ९०,१२६/- असून थुटावर साग नगर ३५ घ.मि. २.५८५ किंमत रु. ५३०३३/- चा माल जप्त करण्यात आला. प्रकरणी ९ आरोपींना अटक करण्यात आली. तसेच मुख्य आरोपीने अटकपूर्व जमीन मिळविला आहे. चौकशी सुरु असून पूर्ण झाल्यावर दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करणेत येईल.

चिल्ली बिटातील अवैध तोडीच्या तपासात प्राप्त माहितीनुसार तेलंगणा राज्यातील निर्मल गावापर्यंत तपास करण्यात आला असता दिनांक ३०.१२.२०१४ रोजी एक टाटा मेटॅडोर साग नग-२९ घ.मी. २.१८२ किमती रु. १,१५,६५४/- हा बिदरअल्ली नाक्यावर जप्त करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत जप्त माल वनपरिक्षेत्र अधिकारी, निर्मल यांचे ताब्यात आहे. प्रकरणी २ आरोपी श्री.विठ्ठल धनाजी माने व श्री.शेख इक्बाल शेख जब्बार यांना अटक करण्यात येऊन त्यांच्याविरुध्द प्रथम श्रेणी न्यायाधिश, महागाव यांचे न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात आले आहे. अवैधरित्या १३ साग वृक्ष तोडीमुळे १.७९३ घ.मि. नुकसानी किंमत रु. ३६,७८७/- असून साग ३० नगर, १.२४४ घ.मि. किंमत रु. २५५२३/- एवढा थुटाजवळ पडुन असलेला माल जप्त करुन सदर माल शासकीय आगार, नागपूर येथे ठेवला आहे.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालसुधारगृहामध्ये बनावट बालके दाखवून करोडो रुपयांच्या अनुदानाचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(६३) * १६३७५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.राजेश काशीवार (साकोली), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाजसेवी संस्थानी बालसुधारगृहात बनावट बालके दाखवून, करोडो रुपयांचे अनुदान अनेकवेळा गिळंकृत करण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील समाजसेवी संस्थांनी अनुदान घेण्यासाठी सुधारगृहे थाटली असून, शासनानेही त्यास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) गेल्या अनेक वर्षापासून सुरु असलेली ही फसवणूक लक्षात येताच सरकारने राज्यातील समाजसेवी संस्थांच्या १ हजार ५७ बालसुधारगृहाचे या वर्षीचे अनुदान रोखले आहे, हे ही खरे आहे काय,

(४)  असल्यास, महिला व बाल विकास विभागाने अनुदान घेण्याचे प्रकार निदर्शनास आल्यानंतर संबंधितांविरोधात कारवाई करण्याऐवजी सर्व बालसुधारगृहातील बालकांची बायोमेट्रिक करण्याचे आदेश दिले त्याचा अहवाल पाठविणा-या संस्थांना प्रती बालक ९५० रुपयांऐवजी १२५० रुपये अनुदान देण्याचे सरकारने आश्वासन दिले होते, मात्र एकाही संस्थेने हा आदेश पाळलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने शासनाच्या बायोमेट्रिक नोंदणी करण्याबाबतच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या तसचे बोगस बालके दाखवुन शासनाचे अनुदान गिळंकृत करणाऱ्या बालसुधारगृहाच्या संस्थांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) नाही.

शासन निर्णय दि.१३ सप्टेंबर, २०१३ नुसार एड्सग्रस्त/मतिमंद मुलांकरिता कार्यरत संस्थांसाठी परिरक्षण अनुदान रु.८२५/- वरुन रु.९९०/- व सर्वसाधारण मुलांसाठी कार्यरत संस्थांसाठी परिरक्षण अनुदान रु.६३५/- वरुन रु.९००/- इतकी वाढ करण्यात आली असून सदर वाढ बायोमेट्रिक यंत्रणा कार्यान्वित करणे तसेच, ट्रॅकचाईल्ड या संकेतस्थळावर माहिती भरणे या अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात आलेली आहे.
(५) राज्यातील ९६९ संस्थांमध्ये बायोमेट्रिक संयंत्र बसविणे बाबत मान्यता दिलेली असून आतापर्यंत ८६९ संस्थांमध्ये बायोमेट्रिक संयंत्र बसविणेत आलेले आहे. उर्वरित संस्थामध्ये संयंत्र बसविणेबाबतची कार्यवाही संबंधित संस्थेमार्फत चालू आहे. बाल कल्याण समितीकडून दाखल आदेश दिल्यानंतर व बालकांच्या प्रत्यक्ष उपस्थितीनुसारच व विहीत अटींची पूर्तता केली असल्यास संबंधित संस्थेस जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून सहाय्यक अनुदान वितरीत करण्यात येते. त्यामुळे बोगस बालके दाखवून अनुदान हडप करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील बालगृहातील बायोमेट्रीक यंत्रणेत बालकांच्या ठशांची खातरजमा होत नसल्याने यंत्रणा निकामी ठरल्याबाबत

**(६४) * १८२०५ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने माहे मार्च, २०११ मध्ये राज्यातील आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग व महिला व बालविकास विभागाच्या निवासीगृहातील मुलां-मुलींच्या हजेरीची पडताळणी करण्यासाठी ७० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला व बालविकास विभागाच्या ९६९ बालगृहासाठी बायोमेट्रिक मशिन्स बसविण्यासाठी पुणे येथील एस ब्रेन सिस्टीम अँड सॉप्टवेअर प्रा.लि.या कंपनीचा प्रति बालगृह २६८०० रुपये या दराने २६ कोटी ९६ लाख ९२०० रुपयांचे बायोमेट्रिक मशिन बसविण्याचे कंत्राट दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालगृहातील बायोमेट्रिक यंत्रणा बालकांच्या ठशांची खातरजमा होत नसल्याने ही यंत्रणा अयशस्वी ठरली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सामाजिक न्याय व महिला व बालविकास या विभागासाठी बायोमेट्रिक संयंत्र बसविणेबाबत एकत्रित निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दि. ३० मार्च २०११ अन्वये घेतला असून, त्यामध्ये सामाजिक न्याय व महिला व बालविकास विभाग यांना संयंत्रासाठी रु.१४,३२,४६,०००/- इतका निधी मंजूर केलेला असून त्याचे नियंत्रण सामाजिक न्याय विभागाकडे आहे.

(२) हे खरे नाही, तथापि, यंत्र पुरवठ्याबाबत माहिती व तंत्रज्ञान संचलनालयाच्या दर करारानुसार ९६९ बालगृहांसाठी रु.२६,८००/- प्रमाणे रु.२,५९,६९,२००/- इतकी रक्कम मंजूर केलेली आहे.

(३) बालगृहातील बालकांच्या उपस्थितीची नोंद बायोमेट्रिक संयंत्रावर करणेबाबत, संयंत्रामध्ये बिघाड झाल्यास असेब्रेन संस्थेकडून दुरुस्त करुन घेणेबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील परिचारिकांना संसर्गजन्य आजाराची लागण होवू नये यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही

**(६५) * २१३७७ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील महापालिका व शासकीय रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेल्या परिचारिकांना रुग्णसेवा करित असताना संसर्गजन्य आजाराची लागण होण्याचा धोका अधिक असतो, मात्र त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनच्या अध्यक्ष यांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने परिचारिकांना संसर्गजन्य आजारापासून संरक्षण विमा योजना तसेच त्यांचे आर्थिक प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केला वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्राप्त झालेल्या निवेदनाच्या संदर्भात मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०५.२०१५ रोजी बैठक आयोजित करुन सर्व मुद्यावर चर्चा करुन यथायोग्य प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

(३) व (४) या संदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी वस्तुनिष्ठ अहवाल अद्याप संचालकामार्फत शासनास प्राप्त झालेला नाही. अभिप्रेत अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

महानगर पालिकेच्या रुग्णालयातील परिचारिकांना संसर्गजन्य विषाणूंचे संक्रमण होऊ नये म्हणून सर्वोतोपरी काळजी घेण्यात येते.

-----------------

**कोकणातील तिलारी धरणासाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला भुसंपादनाचा मोबदला मिळण्याबाबत**

**(६६) * १६९२७ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिलारी आंतरराज्य प्रकल्पासाठी दोडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) भूसंपादीत करण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्तांना नोक-या देणे किंवा नोक-या देणे शक्य नसल्यास एकरकमी अनुदान देणे याबाबत शासनाने नेमलेल्या जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती दिनांक २ फेब्रुवारी, २०१३ रोजी गठीत करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच गोवा व महाराष्ट्राच्या तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्पासाठी जमिनी, घरे याचा त्याग केलेल्या तिलारीतील विस्थापित धरणग्रस्तांनी आपल्या प्रलंबित मागण्याकरिता दिनांक १५ एप्रिल, २०१५ पासून तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असून प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या शासनाने पूर्ण केल्या नाहीतर जलसमाधी घेण्याचा निर्णय त्यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांना लेखी निवेदनाद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कोकणातील तिलारी धरणासाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी देण्याबाबत तसेच वन टाईम सेटलमेंट म्हणून ५ लाख बाबतची कार्यवाही अद्यापपर्यंत झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तिलारी प्रकल्पासाठी आपल्या जमिनींची त्याग करून विस्थापित झालेले प्रकल्पग्रस्तांची कुटुंबे प्रचंड आर्थिक अडचणीत असल्यामुळे त्यांना दिलासा देण्यासाठी भुसंपादनाच्या मोबदला व कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) हे खरे नाही. तिलारी हा महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांमधील आंतरराज्य प्रकल्प आहे. तिलारी प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रातील पात्र प्रकल्पग्रस्त कुटुंबांची संख्या ११९० आहे. त्यापैकी एकूण १६३ प्रकल्पग्रस्तांना शासनाच्या विविध खात्यात नोकरी देण्यात आली आहे. उर्वरित ९४७ प्रकल्पग्रस्तांना नोकरीच्या बदल्यात एकरकमी रु.५ लक्ष इतके अनुदान देण्याचा निर्णय एक विशेष बाब म्हणून दिनांक १७.६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही (जि.चंद्रपूर) या तालुक्याच्या परिसरात गोसीखुर्द प्रकल्पाच्या कालव्याचे बांधकाम मोठ्या प्रमाणात सुरू असल्यामुळे या बांधकामासाठी करण्यात येणाऱ्या जड वाहनांच्या वाहतूकीमुळे रस्ते क्षतीग्रस्त झाल्याबाबत**

**(६७) * १६६६१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही या तालुक्यात गोसीखुर्द प्रकल्पाच्या कालव्याचे बांधकाम मोठ्या प्रमाणात सुरू असल्यामुळे या बांधकामासाठी करण्यात येणाऱ्या जड वाहतूकीमुळे या तालुक्यातील अनेक रस्ते क्षतीग्रस्त झाले असल्याची माहिती दिनांक २१ मे, २०१५ रोजी निर्देशनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोसीखुर्द प्रकल्पाच्या कालव्याच्या बांधकामामुळे ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही तालुक्यातील अनेक रस्ते क्षतीग्रस्त झाल्यामुळे हे रस्ते दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे निधी नसल्यामुळे सदर रस्ते दुरुस्ती करण्यासाठी सिंचन महामंडळाकडून किमान दोन कोटी रुपये निधी देण्याची मागणी प्रस्तावासह

कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी माहे मे, २०१५ च्या दरम्यान आणि लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ मे, २०१५ रोजी कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर व मुख्य अभियंता गोसीखुर्द प्रकल्प कार्यालय, नागपूर यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ते दुरुस्ती करण्यासाठी विदर्भ पाटबंधारे महामंडळाकडून किमान दोन कोटी निधी उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे वा करण्यात येणार आहे आणि सदर निधी केव्हा उपलब्ध करून देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अतिवृष्टी तथा जड वाहतुकीमुळे बऱ्याचशा पुलाचे ॲप्रोचेस क्षतीग्रस्त झालेले आहेत.

(२) होय.

(३) जिल्हा परिषद बांधकाम विभाग, चंद्रपूर व जलसंपदा विभागाचे अधिकारी उक्त प्रकरणी संयुक्त पाहणी करुन अहवाल देतील. या अहवालाच्या आधारे प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळात विचारार्थ ठेवण्यात येईल. नियामक मंडळाचे निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे, पुणे, रत्नागिरी व नागपूर येथील मनोरुग्णालयाचा दर्जा वाढ करण्याबाबत**

**(६८) * १६४५० डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, पुणे, रत्नागिरी व नागपूर येथील मनोरुग्णालयाचे खाजगीकरण करण्याबाबत शासनाने विचार करावा अशी सुचना करीत या रुग्णालयाचा दर्जा वाढवण्यासाठी नेमके काय केले जाणार आहे याचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनाला केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाने केलेल्या आदेशानुसार राज्य शासनाने राज्यातील मनोरुग्णालयाचा दर्जा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) चारही प्रादेशिक मनोरुग्णालयाचे खाजगीकरण करण्याबाबतची सुचना मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात केलेली नाही. तथापि मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७.०४.२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आलू असून मनोरुग्णालयांमध्ये स्वच्छता गृहांची संख्या वाढविणे, स्वच्छा सेवेचे बळकटीकरण, ईनिविदा पध्दतीने आहार, रिक्त पदे भरणे आदीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच रुग्णांसाठी मानसिक तज्ञांकडून उपचार व जनजागृती कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.